१८१

म. ग्रं. सं

विषय
निबंध

लेखक

संग्रहालय क्रमांक
२८
१८१

पुस्त

२८
संक्र.
सार्वज

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ९८२
सन - १८८२

# ...व्यवहारशिक्षण.

लहानसें पुस्तक

गणेश काशिनाथ खरे

यांणीं तयार केलें.

तें

ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

सन १८८२.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केलें आहे.

किंमत ८६ आणे.

म.
विषय
नं. नं.

# सार्वजनिक व्यवहारशिक्षण.

हें

लहानसें पुस्तक

## गणेश काशिनाथ खरे

याणीं तयार केलें.

---

तें

ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

---

**सन १८८६.**

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर केलें आहे.

किंमत ०६ आणे.

सखाराम त्रिंबक पटवर्धन
यांचे स्मरणार्थ,
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,
या संस्थेस नजर.
पटवर्धन
५-१०-२२.
वा. नि. ११८

# प्रस्तावना.

स्तुत आपल्या हिंदुस्थान देशास जी अवस्था प्राप्त झाली आहे, योगानें बहुतेक लोकांवर दैन्याची व दुःखाची वृष्टी होत आहे. श स्वाभाविक सर्व सोयींनीं परिपूर्ण असल्यामुळें हिशेबानें पाहिलें तर लोक सुखी व संपन्न असावे हें साहजीक आहे, परंतु वास्तविक तशी नसून अगदीं उलट झाल्यामुळें सर्व लोक चिंताग्रस्त झाले . जिकडे तिकडे हलक्या प्रतीच्या अन्नवस्त्राची देखील ददात नें आतां पोरें बाळें कशीं जगतील ही काळजी वाढली आहे. नाहीं, पण असाच क्रम चालू राहिल्यास जुन्या अमेरिकन लोकां- आमचा फडशा होईल कीं काय, हा मोठा धाक बसून राहिला आम्हा देशबंधूंची अशी फार भयंकर स्थिति झाली असें खास आल्यावर कोणाचें काळीज करपणार नाहीं? हिंदुस्थान देशाची वेक स्थिति चांगली असतां असला विरुद्ध परिणाम कशानें होतो, सर्वांस मोठें गूढ पडलें आहे. म्हणून असें होण्याचीं कारणें असावीं हें शोधून काढण्याकडे पुष्कळ लोकांचें लक्ष लागलें तथापि अद्याप त्याचा खरा पत्ता लागत नाहीं म्हणून सर्वत्र खिन्नता आहे.

गोष्टीचा ध्यास लागल्यामुळें तिचा अनेक बाजूंनीं शोध व विचार करतां असें होण्यास मूळ कारण आमच्या लोकांचें अज्ञान व तें लोकांस शहाणे व व्यवहारज्ञ करण्याच्या कामीं आमचें फार दुर्लक्ष सून आलें. म्हणून ही गोष्ट उजेडांत ठेवून सर्व लोकांच्या व च्याही दृष्टीस पाडावी, आणि त्यांस जागृत करावें; ह्याच हेतूनें नसें पुस्तक लिहिलें आहे. यांतील विषय गमतीचा नसल्यामुळें त्यांस तो गोड न लागतां कदाचित् रूक्षही वाटण्याचा संभव आहे. ज्या भयंकर रोगानें आम्हा कोट्यावधी लोकांस अगदीं ग्रासून पाडलें आहे, त्याचें नांव, त्याच्या उत्पत्तीचीं खरीं कारणें, व त्यास नाहींसा करण्याचे निश्चित उपाय कोणते; हें सर्वांस कळूं लागल्यास

फारच मोठा उपयोग होण्याची आशा आहे. ती पूर्ण व्हावी ये
हेतूनें हा प्रयत्न केला आहे. म्हणून यांतील अल्पस्वल्प दोषांकडे
न देतां मुख्य विषयाचें नीट मनन करावें अशी सर्व वाचणाऱ्यांस
आहे.

आमच्या देशांतील लोकस्थितीचा व 'न्याशनल एज्युकेशन इन
ह्या इंग्रजी पुस्तकांतील कित्येक गोष्टींचा मनांत नीट विचार कर
लेख लिहिला आहे. हा विषय प्रस्तावरूपानें तरी वाचणाऱ्यांच्या
भरावा म्हणून हा केलेला प्रयत्न किती सफळ झाला आहे हें
ठरवितीलच. परंतु आंत कांहीं जीव दिसल्यास हा विषय बहुत
च्या मनांत भरवितां येईल तितका चांगला. तेणेंकरून ह्या ज्ञान
उपयोग ज्यास्त व लवकर होईल. हें मनांत वागवून आपल्याकडून
तेवढी सर्व वाचणारे मदत करतील असा भरंवसा आहे.

---

# सार्वजनिक व्यवहारशिक्षण.

र्वजनिक व्यवहारशिक्षण हा शब्द वाचतांच कोणास असें वाटेल
नवीन प्रकरण काय आहे ? पण असें नाहीं. ही गोष्ट मुळीच
हे. शब्द मात्र नवखा असल्यामुळें जरा चमत्कारिक वाटेल;
याचा खुलासा कळल्यावर ही गोष्ट अगदीं जुनी आहे असें
च ध्यानांत येईल.

ल्पना करा कीं एक वैद्य आपल्या कामांत फार निपुण आहे. त्याज-
खेडेगांवांतला राहाणारा असा एक रोगी आला. त्याचा वैद्यानें हात
पाहून परीक्षा केल्यावर रोग्यानें विचारलें, महाराज, माझ्या दुखण्याची
काय आहे ? तेव्हां वैद्य बोलला कीं, तुझ्या शरीरांत 'रुधिराभिस-
बरोबर होत नाहीं. हें ऐकून त्या गांवढळ रोग्याचे मनाची स्थिति
झाली असेल हें वाचकहो तुम्हींच मनांत आणा. रोगी संशयांत
सें पाहून रुधिराभिसरण म्हणजे काय हें रोग्यास वैद्यानें नीट समजून
लें. तो म्हणाला, आपण नेहमी जें अन्न खातो त्या पासून काळ-
रक्त तयार होतें, आणि मग तेथून हस्तपादादी शरीराच्या सर्व भा-
ं वांटलें जातें. अशा रीतीनें जें रक्ताचें वाहणें त्याचेंच नांव रु-
सरण. अशा रीतीनें रोग्यास अर्थ कळला, त्यावरून मला
नवतें तरी हें काम शरीरांत नित्य चालत आहे असें त्याच्या लक्षांत
तेव्हां त्यास किती आश्चर्य वाटलें असेल ? हें कार्य बरोबर न
यामुळेंच आपण अशक्त झालों, इत्यादि अनेक गोष्टी मनांत येऊन
वाईट वाटणार नाहीं काय ? आणि ही झालेली अव्यवस्था दूर
आपण लवकर धडधाकट व्हावें, म्हणून तो मनापासून प्रयत्न कर-
नाहीं काय ? खचीत करील यांत संशय नाहीं.

र्वजनिक व्यवहारशिक्षणाची गोष्ट अगदीं अशी आहे. सकृद्दर्श-
ी तें नवें वाटलें तथापि विचार केल्यावर तसें वाटणार नाहीं; कारण
भिसरणा प्रमाणेंच हें कार्य सर्व ठिकाणीं निरंतर चालत आहे. रु-

धिराभिसरण हा शद्ब रोग्यास ठाऊक नव्हता तरी तें कार्य त्याच्या शरीरांत अव्याहत चालत होतें. त्याचप्रमाणें कितीएक वाचणाऱ्यांस सार्वजनिक व्यवहारशिक्षण हा शद्ब ठाऊक नसल्यानें ही गोष्ट नवी ठरत नाहीं. कारण ह्या शिक्षणाचा क्रम आज हजारों हजार वर्षें अस्खलित चालला आहे, आणि तो पुढेंही असाच चालणार. त्या खेरीज दुनयेचा व्यापार चालायचाच नाहीं.

आज दुनयेंत हजारों घडामोडी चालल्या आहेत. आमच्या एकट्या हिंदुस्थानांतच आज २५ कोटी माणसें राहातात. त्यां पैकीं लहान व वृद्ध १० कोटी गाळलीं तरी १५ कोटी मनुष्यें उद्योगधंदे करीत आहेत, व त्यांजवर सर्वांचा निरवाह चालत आहे. त्यांत कितीएक सुतार, लोहार कोष्टी, माळी, भंगी, कासार, कारकून इत्यादि हजारों प्रकारचीं कामें करणारे लोक आहेत. ते सर्व आपापलीं कामें बऱ्यावाईट रीतीनें करतात; पण हीं कामें त्यांस कशीं आलीं ? मनुष्याच्या मूळ स्थितीकडे पाहिलें तर तो उपजत अगदींच अज्ञानी असतो. म्हणून कोणतेंही काम करतां येण्याचें ज्ञान त्यास कशा तरी रीतीनें शिक्षण मिळाल्यावांचून यावयाचें व नाहीं. मग तो तें कोणाचें पाहून शिको, किंवा कोणी त्यास तें मुद्दाम शिकवो. मिळून कोणत्याही प्रकारानें हरएक काम कसें करावें हें एकापासून दुसऱ्यास कळतें त्याचेंच नांव 'सार्वजनिक व्यवहार शिक्षण', रुधिराभिसरणाच्या योगानें शरीरांतील सर्व व्यपार चालतो त्याचप्रमाणें ह्या शिक्षणानें दुनयेंतला सर्व व्यवहार चालत असतो. ह्मणून ह्याकडे सर्वांनीं अवलोकन करून त्यांतल्या सर्व बारीक मोठ्या गोष्टींचा नीट विचार करणें हें फार अगत्याचें आहे.

वरील मजकुरावरून कदाचित अशी शंका येईल कीं, ज्या सार्वजनिक शिक्षणाविषयीं तुम्ही बोलता तें दुनयेंत होतच आहे. तर तुम्ही आतां नवें काय सांगणार ? परंतु वाचकहो असें नाहीं. व्यवहारिक शिक्षण हा शब्द एकच आहे, तरी तो फार व्यापक असल्यामुळें त्यांत अनेक गोष्टी येतात. शिवाय हें शिक्षण मिळावयाचे दोन मार्ग आहेत. दुनयेंतल्या निरनिराळ्या गोष्टी पाहून व्यवहारांत वागणारा मनुष्य उत्तरोत्तर शहाणा होत जातो. ज्या गोष्टी आज त्यास समजत नसतात त्या कांहीं काळानें त्यास आपोआप कळतात. अशा रीतीनें शिक्षण मिळण्याचा जो मार्ग

तो एक, व या खेरीज मुद्दाम निरनिराळ्या वस्तू दाखवून व गोष्टी सांगून शिक्षण देण्याचा जो मार्ग तो दुसरा. ह्या दोन मार्गांच्या गुणावगुणांत जमीनअस्मानीचें अंतर आहे.

प्रत्येक मनुष्यास ज्ञानापासून सुखप्र... होते म्हणून आपलें ज्ञान वाढावें अशी इच्छा असते. याकरितां ज्या गोष्टी आपणास समजत नाहींत त्या समजून घेण्याची त्यास फार हौस वाटते, परंतु ही उत्कंठा सर्वांचे आंगीं सारखी जागृत नसते. तथापि कमज्यास्ती मानानें ती असते खचीत. आपल्यापेक्षां सामर्थ्यानें, ज्ञानानें, व संपत्तीनें जे श्रेष्ठ असतात त्यांचे आंगीं आपल्यापेक्षां कोणचे गुण ज्यास्ती आहेत, व त्यांचे आपले वागणुकींत काय फरक आहे हें पाहाण्याकडे सर्वांचें लक्ष असतें; आणि असें पाहून त्यांस घेतां येण्याजोग्या ज्या गोष्टी दिसतात त्या ते ग्रहण करतात. परंतु हा ग्राहकपणा सर्वांत सारखा नसतो. शिवाय असें अनुकरण करतांना त्यांत पुष्कळ अंशीं दोषांचेंही अनुकरण होतें. यामुळें अशा स्वाभाविक शिक्षणापासून सर्वांस नीट उपयोग होत नाहीं. उदाहरणार्थ खेड्यापाड्यांतील माणसांचे आंगीं तरतरी व शहाणपणा कमी. याचें कारण असलें अनुकरण करण्याजोगीं माणसें तेथें थोडकीं असतात. शहरांत राहणारे लोकांमध्यें ही हुषारी ज्यास्त असते खरी, परंतु गांवढ्यापेक्षां तेथें दोषही ज्यास्त भरलेले असतात, याचें कारण वर लिहिलेंच आहे. शिवाय मुंबईसारख्या धनाढ्य शहरांत रंकाचे राव बनलेले असे कितेक व्यापारी आहेत. परंतु त्यांचें अनुकरण करून केशवजी नाईक व सर जमशेटजी ह्यांसारखीं कोटयाधीश झालेलीं रत्नें किती सांपडतील ? फारच थोडीं. मोजूंच लागल्यास एका हाताचीं बोटेंही पुरतीं लागणार नाहींत. यावरून सहज लक्षांत येईल कीं, अशा शिक्षणापासून उपयोग करून घेणारे लोक फार विरळा. येवढी गोष्ट खरी कीं, हा शिक्षणक्रम मनुष्याच्या जन्मापासून मरणापर्यंत एकसारखा चालू असतो. त्यामुळें उमेदवार मंडळीपेक्षां वृद्ध मनुष्यें अनुभविक ज्ञानानें श्रेष्ठ बनतात. परंतु असला श्रेष्ठपणा येण्यास ह्या क्रमानें सर्व आयुष्य घालवावें लागतें. ही ह्या शिक्षणमार्गांत मोठी उणीव आहे.

दुसऱ्या मार्गाची योग्यता यापेक्षां फार वेगळी आहे. आपलें सर्व आयुष्य व्यवहारांत घालून ज्ञानी झालेल्या वृद्ध मनुष्याचा अनुभव वीस

वर्षांच्या शिकलेल्या बांडास एका महिन्यांत सांगतां आला, किंवा शिवाजी व बाजीराव वगैरे धुरंधर वीरांस कसकशा अडचणी आल्या, व त्या वेळीं त्यांनीं काय काय उपाय योजले, ह्या गोष्टीचें चित्र त्यांस मूर्तिमंत डोळ्यांपुढें उभें करतां आलें, किंवा दूर कशास, आपल्या मुंबईतील सर-जमशेटजी यानीं आठ कोट रुपये मिळविण्यास कोणते मार्ग योजले, अथवा हल्लीं जिवंत असलेल्या केशवजीनायकांचें वर्तन व धनाढ्य होण्याचे कामीं त्यानीं केलेले उपाय एका घटकेंत जर सांगतां आले तर हें अत्यंत इष्ट नव्हे काय? व असें झाल्यानें वरील बडे लोकांप्रमाणें योग्यता मिळवि-ण्याचे मार्ग निश्चितपणें दाखवितां आले तर आज हिंदुस्थानांत असलेले सर्व समंजस लोक मोठ्या आनंदानें इकडे कान देणार नाहींत काय? आणि ही गोष्ट सिद्धीस नेण्याकरितां कंबरा बांधून आम्हास ते मदत करणार नाहींत काय? खचीत करतील यांत संशय नाहीं. अशा अत्यंत इष्ट गोष्टी सिद्ध होण्यास आदिकारण असा जो शिक्षणाचा दुसरा मार्ग त्याचेच संबंधानें हा आमचा लेख आहे.

आपल्या मुलांवर प्रीति करणें व त्यांची काळजी वहाणें हा सर्व प्राणीमात्रांचा मनोधर्म आहे. ह्या नियमांतून मनुष्य सुटला नाहीं. आपल्या मुलांची चांगली जोगवण करावी असें आईस किंवा बापास कोणी शिकवीत नाहीं. ही बुद्धि आपोआप त्यांचे मनांत उत्पन्न होते, व तदनुरूप तीं वागूं लागतात. मनुष्य कितीही नीच असला तरी त्याचे या स्थळीं सर्व दोष मावळतात. आणि आपल्या मुलांचें चांगलें व्हावें अशी निर्मल बुद्धि त्याचे मनांत उदय पावून तीं नेहेमी जागृत राहते. त्या योगानें ह्या गोष्टीचा विचार प्रत्येक मनुष्य आपापल्यापुर्ता करीतच असतो. मग सर्वांनीं ह्याचा विचार करण्याचें काय कारण? असा प्रश्न कदाचित कोणाच्या मनांत येईल. तर त्याचें समाधान असें आहे कीं, सर्व मनुष्यांचे विचार सर्वांशीं सारखे नसतात. मनुष्यांच्या समजुतीप्रमाणें त्यांत बरे वाईटपणा फार असतो. म्हणून पुष्कळांच्या समजुतीची व अनुभवाची एकवाक्यता करून त्या धोरणानें व्यवहारांतील शिक्षणाची पद्धती ठरवून तशी चालू केल्यास किती उपयोग होईल? अशा विचारानें मोठ्या समूहास शिक्षण देण्याचें जें काम ठरविण्यांत येतें त्याचेंच नांव सार्वजनिक व्यवहारशिक्षण.

नि-२६

मनुष्यप्राणी जन्मास येतो तेव्हां तो सर्वांशीं परतंत्र असतो, अशा वेळेस त्याच्या आईचे मनांत जी अनिवार ममता असते ती नसली तर त्या बिच्या-ऱ्या अर्भकाची काय अवस्था होईल? परंतु भगवंतानें त्याची अधींच तर-तूद करून ठेवल्यामुळें मुलांचें नीट पोषण होतें. आईबापांच्या संरक्ष-णानें तें मूल जसजसें वाढत जातें तसतशी आईबापांची त्याजविषयीं काळ-जी कमी होते. परंतु असें होत असतां आईबापांचे शिरावर दुसरी एक-मोठी जबाबदारी येऊन बसते, ती कोणती म्हणाल तर, मुलांच्या शिक्ष-णाची. कितीही विपत्ती व संकटें आलीं तरी तीं सोसून आपल्या मुलांचें पालन पोषण करावें हें मातापितरांचें कर्तव्य आहे असें समजून सर्व लोक आपलीं मुलें वाढवितात, परंतु त्यांस बालपणापासून योग्य शिक्षण देऊन मोठीं होतांच तीं उद्योग धंदा करण्यास लायक बनतील असें करणें हेंही कर्त-व्यच आहे. तें समजून त्याप्रमाणें किती लोक वागतात? आपलीं मुलें शहाणीं व उद्योग निपूण होऊन त्यांचें मोठेपणींही कल्याण व्हावें असें सर्वांस वाटतच असतें. परंतु त्याप्रमाणें योग्य शिक्षण देण्याची तजवीज किती लोकांकडून होते? आतां कांहीं लोक तसें करण्याविषयीं आपल्याकडून पुष्कळ प्रयत्न करतात. तरी सध्या चालू असलेल्या शिक्षण-पद्धतींतच मोठें व्यंग असल्यामुळें त्यांच्या यत्नास बरें फळ येत नाहीं, यामुळें कांहीं मुलें असल्या शिक्षण मार्गानें गेलीं तरी मोठेपणी व्यवहारांत त्यांस हटकून उपयोगी पडण्याजोगें ज्ञान प्राप्त होत नाहीं. ह्या अपूर्ण शिक्षणपद्धतीमुळें शिकलेले व न शिकलेले ह्या दोघांचीही सारखीच दशा होऊन बहुतेक सगळ्याच लोकांस जन्मभर हाल भोगावे लागतात. या-करितां आमच्या देशांतील सर्व लोकांच्या मुलांबाळांस नाडून पाडणारी ही मोठी न्यूनता काढून टाकण्याविषयीं किती लोकांनीं तजवीज केली आहे? ह्याचें उत्तर कसें देतां येईल हें वाचणारे आपल्या मनास विचारतील.

शिक्षणापासून ज्ञानवृद्धि होतें, व ज्ञानाच्या योगानें मनुष्याचें साम-र्थ्य वाढतें. ही गोष्ट आज नव्यानें सिद्ध करावयास नको. व्यवहरांत घडोघडी ह्याचीं उदाहरणें दृष्टीस पडतात. पाहा, एक मनुष्य उत्तम न्याया-धीश बनून न्यायासनावर बसतो, व दुसरा मनुष्य द्रव्यलोभानें खून करून आरोपी होऊन त्यापुढें उभा राहतो. बाह्यदृष्ट्या दोघेही सारखेच मनुष्य. किंबहुना आरोपीच जवान दिसेल, पण उपजत दोघांची

स्थिति एकच. असें असतां एकास सुशिक्षणाच्या टांकीनें घडल्यामुळें तो न्यायाधीश बनून श्रीमान झाला, आणि दुसरा खाणींतून काढलेल्या दगडासारखा अशिक्षित राहिल्यामुळें दरिद्री होऊन द्रव्याच्या लोभानें खून करून फांशी गेला! अरेरे! अज्ञानाचा किती भयंकर परिणाम हा! त्याच मनुष्यास जर उत्तम शिक्षण मिळालें असतें तर तो कुलदीपक होऊन बसला असता, पण अज्ञानामुळेंच त्याची ही अशी स्थिति! हा अपराध खरोखर पाहिले तर त्याच्या आईबापांकडे किंवा सार्वजनिक शिक्षणाविषयीं दुर्लक्ष्य करणाऱ्या लोकांकडे? अशा हजारों गोष्टी निरंतर ढळढळीत डोळ्यांनीं दिसत असतां त्याचें खरें कारण कोणाचे लक्षांत येऊं नये, ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे.?

आज आमच्या देशाची स्थिति फार वाईट झाली, लोक दरिद्री झाले व व्यापार बुडाला. हें पुनः पुनः सांगावयास नको. झोपेंत देखील स्वप्नें अशीं पडतात कीं, आम्हीं सर्वत्रास मुकून आमचीं दिवाळीं वाजलीं. अशी सर्वत्र दुःखदायक स्थिति आमच्या देशास प्राप्त झाली हें सर्वांस अनुभवानें कळत असल्यामुळें तिची बतावणी करून सांगत नाहीं. संकट येऊन ठेपलें म्हणजे मनुष्य कसें ही बेफाम असलें तरी सावध होतें, आणि असें कां झालें ह्याचा विचार करतें. परंतु अडचणींत पडलेला मनुष्य गोंधळलेला असतो म्हणून त्यांचे मनाची वृत्ति शांत नसते. यामुळें आतां काय करावें हें त्यास बरोबर सुचेनासें होतें. अशा भयंकर पेंचाटींत सांपडून आपल्या देशाची दुर्दशा कां झाली ह्याचा विचार सर्व लोक करीत आहेत. परंतु असें होण्याचें खरें कारण काय हें अद्याप कोणाच्याही तोंडून बाहेर पडत नाहीं. कोणी ह्मणतात असें होण्यास आपल्या येथली कारागिरी नाहींशी झाली. याकरितां विलायतेहून यंत्रें आणून चालू केलीं पाहिजेत. दुसरा म्हणतो आपले लोकच मूर्ख, एकमेकांवर भरंवसा नाहीं, त्यांच्यांत काम करण्याची योग्यता नाहीं, अशांचे हातून काय होणार? तिसरा म्हणतो छेहो, तें कांहीं नाहीं. आपलेकडे जातीभेद फार व धर्म पुष्कळ आहेत, ते सर्व नाहींसे करून एक धर्म झाला व जाती मोडल्या ह्मणजे सर्व सुरळीत चालेल. अशीं अनंत मनुष्यें अनंत प्रकारचीं कारणें सांगतात, परंतु कोणाचा कोणाशीं मेळ पडत नाहीं, व ह्या अफाट देशांतील कोटयावधी मनुष्यांस ज्या दैन्य-

रूप रोगानें ग्रासलें आहे, त्याच्या निरसनाचा उपाय सर्व लोकांस करतां येण्याजोगा असा अद्याप निश्चयपूर्वक एक मार्ग ठरत नाहीं. हें केवढें दुर्भाग्य ! ! !

असें होण्याचें खरें कारण म्हटलें म्हणजे सार्वजनिक व्यवहारशिक्षणाची उणीव हेंच होय. वर जीं मतें सांगितलीं तीं सर्वांशीं खोटीं नाहींत. त्यांत पुष्कळ अंश घेण्यासारखा आहे. तथापि शिक्षणानें लोकांची समजूत वाढली म्हणजे वरील सर्व गोष्टी पाहिजेत तेवढ्या अंशानें त्या आपोआप ग्राह्य होतील. ज्ञान वाढल्यानें आपले कारागीर हुशार होऊन त्यांचे हातून नवीन यंत्रें तयार होतील. लोकांचा मूर्खपणा गेला म्हणजे एकमेकांवर भरंवसा पटेल, व त्यांचे आंगीं कामें करण्याची योग्यता येईल. जातीभेद वाईट आहे असें सर्वांस समजून आल्यास सगळ्याना सोयीवार पडण्याजोगी अशी व्यवस्था आपोआप होईल. तात्पर्य ह्या सर्व गोष्टी होण्यास मूळ कारण सार्वजनिक व्यवहारशिक्षणाची वृद्धि हेंच होय.

दोनहजार वर्षांपूर्वीं इराण देशांत असा एक कायदा होता कीं, जीं आईबापें आपल्या मुलांस योग्यरीतीनें शिक्षण देणार नाहींत त्यांस ह्मातारपणीं त्यांच्या मुलांनीं पोसूं नये. आपल्या देशांत असा कायदा चालू केला तर त्याच्या शिक्षेंतून आज आपल्यांतले किती लोक सुटतील ? शेंकडा दोन देखील सुटण्याची मुष्कील पडेल. हा कायदा इराणांत चालू होता तोंवर त्या देशाचें सर्व प्रकारें कल्याणच झालें. युरोपांत स्पार्टा म्हणून पूर्वीं एक संस्थान होतें, तेथें लष्करी शिक्षणाचे संबंधानें असाच कायदा होता; त्यामुळें त्यांचाही सर्वत्र जयच होत असे. हल्लीं युरोपांत प्रुशिया म्हणून जो देश आहे, तेथें सार्वजनिक शिक्षणाची व्यवस्था फार उत्तम आहे. सन १८६६ सालीं आस्त्रियाशीं व सन १८७० सालीं फ्रान्स देशाशीं त्यांची लढाई झाली. त्या दोन्ही लढायांत प्रुशियाचाच पूर्ण जय झाला. ह्याचेंही कारण त्यांच्या देशांतलें उत्तम सार्वजनिक व्यवहार शिक्षण हेंच होय. युरोपांतल्या इतर देशांत देखील शिक्षणाची व्यवस्था चांगलीच आहे. म्हणून वरच्या लढाईबद्दल फ्रान्स देशास २०० कोटी रुपये दंड पडला. तथापि चमत्कार हा कीं, ज्ञानाच्या जोरामुळें फ्रेंच लोक अगदीं डगमगले नाहींत. फ्रान्सांतल्या सर्व लोकांनीं स्वदेशाभिमानाच्या आवेशानें बळकट कंबरा बांधून तीन वर्षांच्या आंत आपल्या

देशाची स्थिति ताळ्यावर आणली. धन्य त्यांची. हा येवढा प्रताप कशाचा ? तर त्यांस मिळालेल्या सार्वजनिक व्यवहारशिक्षणाचा. असली योग्यता आमच्या लोकांच्या आंगीं येईल काय ? असें घडून येईल तो मोठा सुदीन म्हटला पाहिजे.

वरील मजकूर वाचून कदाचित एक प्रश्न उभा राहील कीं, इतका वेळ जें रामायण सांगितलें तें सगळें सार्वजनिक शिक्षणाचें स्तोत्र. पण आमच्यांत पूर्वीं कालिदास, भवभूति, वराहमीहीर, इत्यादि मोठाले विद्वान होऊन गेले त्याना कोणी शिक्षण दिलें ? किंवा ज्या शिक्षणाचा मोठा प्रताप गाता तशा प्रकारच्या आमच्या प्रतापी 'शिवाजी' व 'बाजीराव' इत्यादि धुरंधर वीरांस कोणी शिक्षण दिलें ? त्यांचा जात्या अंकुरच तसला, व त्यांच्या नशीबानें उदयाची वेळ आली तेव्हां ते आपोआप विद्वान व शूर निपजले. जो हिरा असतो तो आपोआपच चमकूं लागतो. हे सगळे नशीबाचे खेळ आहेत, कपाळाशीं कपाळ घांसून कांहीं व्हावयाचें नाहीं. असें आहे तर मग तुमच्या शिक्षणाचें इतकें महात्म कशाला हवें ? हें म्हणणें ऐकून क्षणभर स्तब्ध बसावें लागेल खरें. पण याजवरही समाधान आहे. आमच्या बहुतेक वाचणाऱ्यांस माहित आहे कीं, शिवाजी महाराजांचे कीर्तिध्वज सगळ्या हिंदुस्थानभर उभारले आहेत. तरी हें रत्न खाणींतून बाहेर पडल्याबरोबर आपोआप चमकूं लागलें नाहीं. तर कुशल कारागीर खाणींतल्या हिऱ्यास युक्तीनें घांसून व पैलू पाडून जसा डौलदार व मौल्यवान बनिवतो, त्याचप्रमाणें शिवाजीची माता जिजाबाई, व गुरू दादोजी कोंडदेव आणि रामदास ह्यांनीं त्याला जें उत्तम शिक्षण दिलें त्या संस्काराचें हें फल होय. गेल्या शतकांत पहिला बाजीराव हा एक हिराच निपजला. त्यावर तरी पैलू कोणी पाडले व जिल्हई कोठें मिळाली म्हणाल तर त्याचे घरीं त्याच्याच बापानें. बाळाजी विश्वनाथानें जें त्याला अत्युत्कृष्ट शिक्षण दिलें त्याचाच हा प्रताप. जातीचा खरा हिरा जरी असला तरी खाणींतून निघालेल्या ओबडधोबड स्वरूपानें व आकृतीनें फारसा उपयोगीं पडत नाहीं. जेव्हां तो चतुर कारागिराच्या हातीं पडून घांसला जातो, व त्याजवर पैलू पडून जिलई बसते, तेव्हांच त्याचे सर्व भाग चमकदार होऊन तो कोंदणांत बसविण्यास पात्र होतो. त्याप्रमाणेंच शिक्षणाच्या योगानें मनुष्यास चांगली स्थिति प्राप्त होते.

आमच्यांतील स्त्रिया व सगळे शेतकरी हीं खरीं माणसेंच आहेत. पण दुर्दैवानें त्यांस शिक्षण मिळत नसल्यामुळें त्यांच्या आंगीं हुषारी व शहाणपणा कितीसा वसतो हें सर्वांस ठाऊकच आहे. परंतु त्याच खाणींतल्या व त्यांच्याच पोटीं जन्मलेल्या कितेक मुलांस सुदैवानें उत्तम शिक्षण मिळतें, तीं शहाणीं व हुषार बनतात, आणि त्यांच्या अकलेची व ज्ञानाच्या श्रेष्ठपणाची कीर्ति सर्वत्र पसरते. आतां हीं दोन्हींही सारखींच माणसें असून परस्परांच्या गुणामध्यें येवढी मोठी तफावत पडते ती कशानें? एक जातीमुळें, कीं भिन्न शिक्षणामुळें? सांगायचें तात्पर्य इतकेंच कीं, आमच्यांतले अगदीं अडाणी शेतकरी व स्त्रिया, आणि शहाणपणाविषयीं नावाजलेले मोठाले विद्वान हे एकसारखींच माणसें खरीं. परंतु पहिल्यांवर सुशिक्षणाच्या सुतकीचा टोला किंवा टांकीचा घाव मुळींच बसत नसल्यामुळें त्यांच्या मूळ स्थितींत कांहींच फरक न पडतां खाणींतल्या दगडासारखे जशाच्या तसे अज्ञानी राहतात. आणि दुसऱ्यांवर सुशिक्षणाची सर्व कुटाकूट व घांसाघांस होऊन ज्ञानाचा संस्कार घडतो म्हणून त्यांच्यांतले दोष झडतात, आणि मनुष्यपणाचे खरे सद्गुण उदयास येऊन विकास पावतात. म्हणून त्यांची योग्यता मौल्यवान हिऱ्यापेक्षांही अनंतपटीनें अधिक होते. यावरून ह्या फेरफारास मुख्य कारण दैवयोग नसून सुशिक्षण योगच खास आहे असें सर्वांच्या लक्षांत येईल. आमच्या देशाच्या सुदैवानें सर्व आईबापें आपआपल्या मुलांबाळांस [ जिजाबाई व बाळाजीप्रमाणें ] लहानपणापासूनच ममतेनें ज्ञानामृत पाजूं लागल्यास घरोघर रत्नें तयार होण्यास काय अशक्य आहे? ह्या वाक्यानें कदाचित कोणास हसूं येईल. परंतु क्षणभर विचार केल्यावर ही गोष्ट असंभाव्य नाहीं. श्रमसाध्य आहे असें सर्वांस कबूल करावें लागेल. फार तर काय आमच्या सुदैवानें सर्व लोकांस सार्वजनिक व्यवहार शिक्षण मिळण्याचे मार्ग उत्तम प्रकारचे तयार होऊन चालू झाले तर त्यांतून मोठालीं एक दोनच ज्ञानरत्नें निघतील असें नाहीं, तर तसलीं असंख्य मनुष्यें निरंतर तयार होण्याचा अखंड झरा लागेल. आणि तेणेंकरून हल्लीं आमच्या देशांतील धंदाउद्योगांस भयंकर जरा आली आहे ती नाहींशीं होऊन त्यांस अखंड तारुण्य प्राप्त होईल यांत संशय नाहीं.

आमच्या देशांतील कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, ह्या जगाचा सर्व खटाटोप परमेश्वर सत्तेनें चालला आहे. त्याच्या इच्छेखेरीज एक पान देखील हालत नाहीं असें असतां आम्ही पामरांनीं उगीच तडफड करून काय उपयोग? परमेश्वर इच्छेनेंच जें होणें असेल तें होईल. आम्ही त्याचें मनोभावें ध्यान करून स्वस्थ असावें. हा संसार म्हणजे दुःखाचा डोंगर. ह्यांत सुख पाहिलें तर मोहरीपेक्षांही कमी, व ह्यांत शाश्वती नसून सर्व व्यापार पाण्याच्या बुडबुड्यासारखा क्षणिक आहे. हें तत्व आपल्या पूर्वजांनीं जाणलें म्हणूनच त्यांणीं संसाराचा पसारा तुच्छ मानला आणि परमार्थ वृत्ति धारण केली. असला खरा व उत्कृष्ट मार्ग टाकून ह्या खोट्या संसाराच्या कांटेऱ्या वाटेंत शिरावें आणि त्याचें दुःखभरित ओझें डोक्यावर घेऊन मग हाय हाय करीत दारोदार भटकत फिरावें यांत लाभ तो कोणता? जी ओली कोरडी मिळेल तींतच तृप्त राहून हरी हरी म्हणत स्वस्थ घरीं बसावें हें बरें. उगीच द्राविडी प्राणायामाच्या नादीं लागून नसता उपद्व्याप करून घ्यावा हें नीट नव्हे असा त्यांचा समज आहे.

आमच्या देशांत प्राचीन काळीं ह्या परमार्थ बुद्धीचा फार जोर होता त्यामुळें स्वार्थावर व संसारसुखावर लाथ मारून केवळ निरापेक्ष बुद्धीनें ईश्वर ध्यानांतच निमग्न होऊन राहणारे असे पुष्कळ सत्पुरुष होऊन गेले. ते व त्यांच्या कृति आम्हास शिरसावंद्य आहेत, परंतु आज ह्या जगास जी स्थिति प्राप्त झाली आहे व तिच्या अनुरोधानें मनुष्यांच्या मनाचा व आचरणाचा जो कल फिरला आहे त्याला ताळ्यावर आणण्यास सोपा व त्यांस आवडण्याजोगा असाच मार्ग योजिला पाहिजे; कारण आज हजारों वर्षांपासून संसारसुखाच्या गोडीस लुब्ध होऊन लालचावलेल्या माणसांस ह्या क्षणिक संसाराचा त्याग करून तुम्ही वैराग्यशील व्हा. असा कोणी घसा फोडून उपदेश केला तरी कोणी ऐकावयाचे नाहींत. पण असें ह्मणणाराला ते वेडा मात्र ठरवितील. यास्तव असल्या मनुष्यांच्या मनाची व आचरणाची स्थिति सुधारण्यास मूळ कारणीभूत जें शिक्षण तेंच आधीं दुरुस्त करून त्याचा सर्व लोकांत पुष्कळ प्रसार केला पाहिजे. म्हणजे मग ते हळू हळू स्वार्थ साधून परमार्थ सुखाचाही लाभ घेऊं लागतील. शिवाय ज्याला त्याला पोटाची काळजी असते म्हणून त्याची

वा.नि. ११८

सोय ज्या मार्गांत दिसेल तिकडे लोक लवकर वळतात. ही सर्वांची इष्ट कामना शिक्षणानें परिपूर्ण होण्याचा संभव फार आहे. तो कळून आला म्हणजे लोक ह्या शिक्षण मार्गानें भराभर चालतील. हा उद्देश मनांत ठेवून हा लेख लिहिला आहे.

मनुष्याचा स्वभाव असा कांहीं विलक्षण आहे कीं, एकादी गोष्ट चांगली व ती करणें अति अवश्यक आहे; येवढे म्हटल्यानें त्याचें समाधान होत नाहीं. तर त्यांत वास्तविक तथ्य किती आहे हें समजण्याची त्यास फार उत्कंठा असते. मनुष्य जसजसा ज्ञानवान होतो तसतसा त्याच्या आंगीं चिकित्सकपणा वाढतो. आलीकडे तर पाश्चात्य ज्ञानानें बहुत लोकांची वृत्ति पुष्कळ अंशीं अशीच झाली आहे. यामुळें जी गोष्ट एकाद्या मनुष्यास बरी वाटते, ती पुस्तकरूपानें बाहेर आल्यास हजारों लोक तिची पारख करतात. मग त्यांत जेवढें सत्य असेल तेवढेंच टिकतें. व हिणकस असेल तें गळून जातें. एकादा मनुष्य कितीही तिस्मारखान किंवा अरेराव असो, त्यानें ग्रंथरूपानें डोकें बाहेर काढलें कीं, लगेच लोकमताच्या धारवाडी कांट्यांत त्याच्या वजनाची टीप होते. तेथें गुंजभरही कमज्यास्ती सोसत नाहीं. मग त्यामध्यें कांहीं तथ्य नसल्यास त्याची भंबेरी उडविण्यास लोक तिळभरही मागें पुढें पहात नाहींत, व त्यांत योग्य गुण दिसल्यास बक्षीस देण्यासही उशीर लावीत नाहींत असें अनेक वेळां दिसून आलें आहे.

हा मजकूर वाचून वरच्या नियमाप्रमाणें बहुतेकांची वृत्ति झाली असेल, व हें वाचतांना कित्येक वाचकांच्या ओंठावर असेही शब्द आले असतील कीं, ‘अहो हें तुम्हीं मांडलें आहे काय ? सार्वजनिक शिक्षणापासून फार चांगले परिणाम होतात असें आपण म्हणता, व केवळ तोंडांतील शब्दांच्या प्रमाणांनीं ही गोष्ट सिद्ध करता, पण ह्यास कांहीं अनुभवसिद्ध पुरावा आहे का ? तसें कांहीं असेल तर दाखवा. त्या खेरीज तुमच्या म्हणण्यास मजबुदी यावयाची नाहीं. व तसें होईपर्यंत आम्हास पोकळ बोलणें रुचावयाचें नाहीं व मान्यही व्हावयाचें नाहीं. म्हणून असें कांहीं असेल तर काढा बाहेर.’ तर वाचकहो आपला मनोदय समजूनच आपल्यास सांगतों कीं, ही गोष्ट सर्वथैव खरी आहे. व ह्या म्हणण्यास साक्षात् व अनुभवशीर असा पुष्कळ पुरावा आहे. ही वाटाघाट आपण

एक दोन व्यक्तींच्या दृष्टीनें करीत नाहीं. तर सार्वजनिक शिक्षणाचा परिणाम एका मोठ्या देशांतील कोटयावधि लोकांवर काय होतो हें पाहात आहों म्हणून अशा कामीं दुसऱ्या एकाद्या देशाचा अनुभव काय आहे तोच पाहिला पाहिजे.

सार्वजनिक शिक्षणाच्या सोयी असल्यानें लोकांची स्थिति सुधारते ही गोष्ट मुळींच वादग्रस्त नाहीं. ती पूर्ण अनुभवानें सिद्ध झालेली आहे; कारण असल्या शिक्षणाच्या योगानें शक्तीमान झालेले व योग्यता पावलेले असे देश आज ढळढळीत आपल्या डोळ्यांपुढें उभे आहेत. आणि ह्या शिक्षणापासूनच आम्हासही बरी स्थिति आली असें सांगणारे लोक तेथें दहा पांच नाहींत तर हजारोंहजार आहेत. तेथें इतकी चांगली स्थिति आली म्हणून तेथल्या शिक्षणाचे प्रयत्न ढिले न पडतां त्यांत होईल तितकी आणखी सुधारणा वाढविण्याचे परिश्रम सतत रात्रंदिवस चालले आहेत. तें उत्कंठेचें आचरण पाहाणारांस असें वाटतें कीं, ह्या कामास त्यानीं जणुकाय आजच आरंभ केला आहे.

आजपर्यंत निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या वेळीं मनुष्य जातीचें कल्याण करणारे असे पुष्कळ पुरुष होऊन गेले. त्यांत कालदेशाच्या मानानें जरी भेद दिसतो, तथापि कितेक गोष्टी त्या सर्वांस सारख्या लागू पडतात. लोकांचें खरें कल्याण होण्यास अमुकच केलें पाहिजे असा त्यांच्या मनानें एकदां ग्रह घेतला कीं पुरे. मग त्याच्या सिध्यर्थ यत्न करितांना ते लोकापवादास अगदीं भीत नसत. यामुळें त्यांची कार्यसिद्धी होई तोंपर्यंत लोक त्यांचा फार छळ करीत. आपल्याइकडे होऊन गेलेले तुकाराम, रामदास, व भास्कराचार्य, इत्यादिकांचा लोकांनीं पुष्कळ उपहास केला. त्याचप्रमाणें युरोपांत ग्यालिलिओ, न्यूटन, पेस्टालोजी, इत्यादिकांचीही अशीच दशा झाली होती.

युरोपखंडाच्या मध्यभागीं लहान मोठे अनेक देश आहेत. त्यांतील एका लहानशा देशाचें नांव 'स्वित्सरलंड' असें आहे. परमार्थाचा विचार करणारे असे निःसीमभक्त पूर्वीं आमच्यांत निर्माण झाले होते त्याचप्रमाणें व्यवहाररीत्या मानव जातीचें खरें कल्याण कसें करतां येईल ह्याचा विचार करणारे असे कांहीं पुरुष तेथें होऊन गेले. ख्रिस्ती शकाच्या गेल्या शतकांत "पेस्टालोजी" ह्या नांवाचा एक मनुष्य तेथें होऊन गेला. त्याचे

हातून सार्वजनिक शिक्षणाच्या बीजारोपणास पुष्कळ मदत झाली. तो स्वतः गरिबींत असल्यामुळें त्याच्या आसपासच्या लोकांची विपत्ती व हाल नेहेमी त्याच्या दृष्टीस पडत. यामुळें असें होण्याचें कारण काय असावें हें शोधण्याकडे त्याचें लक्ष वेधलें. विचार करतां करतां त्याच्या मनांत असें आलें कीं, ह्या लोकांचें एकंदर ज्ञान कमी, सृष्टींतील निरनिराळ्या गोष्टींकडे त्यांचें दुर्लक्ष्य, व त्यांचा स्वभाव अविचारी, अविश्वासी, हलकट, व अव्यवस्थीत; इत्यादि न्यूनता त्यांचे आंगीं विशेषें करून त्यास दिसून आल्या. ह्या दूर करण्यास ह्या लोकांचे मुलांस चांगलें शिक्षण दिलें पाहिजे असें प्रथम त्यास वाटूं लागलें. याच सुमारास तेथें अनेक लढाया झाल्यामुळें सर्व देशभर बेवारसी व पोरक्या पोरांची संख्या फार वाढली होती. यामुळें त्याचें लक्ष इकडे अधिकच लागलें. त्यानें अशीं कांहीं मुलें जमा करून त्यांची एक शाळा स्थापन केली. त्या मुलांचें पोषण तो केवळ आपल्या खर्चानें करीत असे. कधीं कधीं तो आपण भिक्षा मागून त्या मुलांचा निर्वाह करी. अशा रीतीनें बरेच दिवस लोटले. इतक्या काळांत लोकांनीं त्याचा फार छळ केला. शिवाय त्याची स्वतःची फार विपत्ती होती तरी ती सगळी सोसून त्यानें आरंभलेलें काम अर्धवट सोडलें नाहीं. अशा अडचणींत पडलेल्या पुरुषानें मोठ्या नेटानें धीर धरून कंबर बांधली म्हणूनच त्याचें फळ आज तेथील सर्व लोक भोगीत आहेत. अशा क्रमानें चालतां चालतां कांहीं काळा नंतर त्याच्या श्रमाची योग्यता लोकांस कळूं लागली. तेव्हां आसपासच्या प्रदेशांतील मोठमोठे विद्वान व श्रीमान लोक त्याची कीर्ति ऐकून त्याच्या भेटीस येऊं लागले. अशा रीतीनें ह्या मोठ्या चांगल्या कामाची तेथें स्थापना झाली.

त्या नंतर बरींच वर्षें असाच क्रम चालू होता. पुढें चालू शतकाच्या आरंभी स्वित्सरलंडांत दुसरा एक मनुष्य याच कामांत लौकीकास चढला. त्याचें नांव "फेलन्बर्ग" हा घरचा मोठा संपत्तीमान असे. परंतु त्या सुमारास फ्रान्स देशांत जी मोठी धुमाळी* चालली होती तीमुळें ह्यास

---

* गेल्या शतकाच्या अखेरीस फ्रान्स देशांत एक मोठी राज्यक्रांती झाली. ती इतिहासांत 'फ्रेंच रेवोल्यूशन' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. त्या वेळीं तेथें सर्व देशभर मोठी पुंडाई माजली होती. लोकांच्या डोक्यांत स्वातंत्र्याचें वेड शिरू-

(पुढें चालू.)

फार दुरदूरचे देशांत प्रवास करावा लागला. हा घरचा सुखी व बुद्धिमान असल्यामुळें त्यास फार चांगलें शिक्षण मिळालें होतें. याचा स्वभाव आंगचा फार चौकस व शोधक असे. यामुळें प्रवासांत पुष्कळ नव्या गोष्टी त्याच्या दृष्टीस पडल्या. निरनिराळ्या देशांतील लोकांचें दारिद्र्य व विपत्ती पाहून त्यास फार वाईट वाटे. व हें नाहींसें करण्यास कोणते उपाय योजावे हा विचार त्याचे मनांत नेहेमी घोटाळत असे. शेवटीं खल करतां करतां त्याचे मनाची पक्की खात्री झाली कीं, एकंदर देशाची स्थिति सुधारण्यास लोकांस योग्य शिक्षणच मिळालें पाहिजे. म्हणून आतां दुसऱ्यावर कोलाकोली न करितां ह्या महत्कार्य सिध्यर्थ होईल तितका आपण जातीनें प्रयत्न करावा असा त्यानें मनांत निश्चय केला. आणि सन १८०५ सालीं तो आपल्या घरीं आला. नंतर त्यानें आपला हेतु सिद्धिस नेण्या करितां एक शाळा स्थापन करण्याचा बेत योजला. तेव्हां त्याचे मनांत असें आलें कीं, ही शाळा केवळ स्वतंत्रपणें आपल्या खर्चानें चालविली पाहिजे. कारण तसें केल्याखेरीज आपणास वाटेल तशी व्यवस्था ठेवतां येणार नाहीं. व आपल्या मना प्रमाणें व्यवस्था केल्यास ह्या शिक्षणापासून लोकांस कितपत उपयोग होतो हें स्पष्ट रीतीनें लोकां-

---

( मागील पृष्ठावरून. )

न ते पूर्णपणें खवळून गेले होते. अशा स्थितींत त्याणीं तेथील राजा, राणी, व त्यांचीं मुलें, ह्या सर्वांस एकदम कैद केलें, व कांहीं दिवसांनीं त्या सर्वांस त्याणीं हाल हाल करून मारलें. हा वृत्तांत वाचतांना प्रत्येक वाचणाऱ्याच्या डोळ्यांतून टिपें गळतात. अरेरे!!! जो राजा फार चांगला असें सर्व लोक ह्मणत असत तोच एक वर्ष झालें नाहीं तों अगदीं मूर्ख ठरून त्याच लोकांचे हातून त्याचा अंत व्हावा ना? हर हर! मानवी प्राण्याचा स्वभाव फार अगाध आहे. ह्या राज्यक्रांतीनें फ्रान्स देशांत हजारों घरंदाज व कुलीन लोक प्राणास मुकले, व एकंदर देशाची फार नासाडी झाली. इतकेंच नाही, तर त्याचे आसपास दुसरे जे अनेक देश आहेत त्यांस ही कमीज्यास्ती मानानें बराच धक्का पोंचला. सर्व युरोपखंडांतील राजांस मोठी भीति पडली. व त्यामुळें सगळ्या युरोपांत मोठा फेरफार झाला. हा प्रकार सन १७९० पासून तो सन १८०५ पर्यंत एकसारखा चालला होता. ह्यामुळें फ्रान्स व त्याचे आसपासचे देश ह्यांतील बहुत लोकांची फार खराबी झाली, व एकंदर लोकांची विपत्ती व दारिद्र्य फार वाढलें. अशा वेळेस वरील मनुष्यानें पुष्कळ देशांत प्रवास केला.

च्या दृष्टीस पाडतां येईल. असा त्याणें पुर्ता विचार करून कामास सुरु-वात केली.

प्रथम त्याणें आपल्या मुलांना शिक्षण देण्याचा आरंभ केला. व त्यांचे बरोबरच दुसरीं तीन मुलें आपले घरीं ठेविलीं. त्या मुलांस तो आपल्या मुलांबरावरच शिकवीत असे. कांहीं काळा नंतर पुन्हा दुसरीं दोन तीन मुलें आणून त्यांस शिक्षण द्यावें असा क्रम कांहीं दिवस चालला. त्यामुळें गोंधळ न होतां त्या मुलांस ह्या शाळेच्या उत्तम सवयी लागत. सन १८०७ सालीं या शाळेकरितां त्यानें एक नवी इमारत बांधली. तींत सुमारें ८७ विद्यार्थी आले. हे बहुतेक संभावीत लोकांचे मुलगे होते. खेरीज याच सालीं गरीब मुलांकरितां त्यानें दुसरी एक शाळा स्थापन केली. तिजवर त्यानें "व्हेर्लि" ह्या नांवाचे मनुष्याची नेमणूक केली. हा एका शिक्षकाचा मुलगा होता. यास त्यानें आपले घरीं ठेवून शिक्षण देण्याचे कामांत पूर्वीच तयार केलें होतें. ही शाळा प्रथम एका शेतां-तल्या झोंपडींत भरत असे. तेथें आसपासच्या गरीब मुलांबरोबर तो काम करी, विश्रांतीच्या वेळीं त्यांशीं तो स्नेहानें वागे, व नेमलेल्या वेळीं त्यांस शिक्षण देई. ही शाळा केवळ गरीब लोकांचे मुलांकरितां होती. तेथें शिक्षण देण्याचा मुख्य उद्देश असा होता कीं, गरीब लोकांस शेतांत नेहेमीं खपावें लागतें व कष्ट करावे लागतात; याकरितां शेतांत कामें करतांनाच त्यांना शिक्षण दिलें म्हणजे काम व शिक्षण ह्या दोन्ही गोष्टी एकाच वेळीं सुयंत्रपणें चालतील. आणि अशा शिक्षणापासून प्राप्त होणाऱ्या ज्ञानाचा खरा उपयोग त्यांस आपल्या धंद्यांत करतां येईल. वाचकहो, असल्या शिक्षणाचा प्रकार आमच्या देशांत कोठें तरी सुरू झाला आहे का ?

यानंतर कांहीं दिवसांनीं त्यानें आपल्या खर्चानें एक शिक्षकांची शाळा*

---

* नवे शिक्षक तयार करण्याची शाळा. लोकांस निरनिराळ्या विषयांची माहिती मिळावी म्हणून अशा विषयांवर नवे ग्रंथ होणें फार इष्ट आहे, परंतु असे ग्रंथ तयार झाल्यावर त्याचा लोकांत प्रसार होण्यासाठीं छापखाने जसे अवश्य असतात त्याचप्रमाणें शिक्षणाच्या प्रसारार्थ शिक्षकांची शाळा हें मोठें साधन होय. छापखान्यांतून ग्रंथाच्या अनेक प्रती निघतात त्याचप्रमाणें ह्या

( पुढें चालू. )

सुरू केली. ही शाळा स्थापन होतांच सुटीचे दिवसांत आसपासच्या प्रदेशांतील शाळांवरील पुष्कळ शिक्षक तेथें येऊं लागले. त्यांस 'फेलन्बर्ग' व्याख्यान रूपानें शिक्षण देई. पुढें पुढें तेथें येणाऱ्या शिक्षकांची संख्या इतकी मोठी वाढली कीं, घरांत राहवयास त्यांस जागा पुरत नसे. म्हणून जागोजाग तंबू ठोकून ते आपली सोय करीत. दर साल एक महिनाभर हा समाज '*हाफ व्हिले' ह्या गांवांत भरे. तेव्हां त्या गांवांत जणू काय मोठी जत्राच भरली आहे असें वाटे. ह्या सर्व लोकांस 'फेलन्बर्ग' आपल्या खर्चानें जेवणें देत असे. तेव्हां सर्वांस मोठाल्या मेजवान्या मिळाल्याप्रमाणें हर्ष वाटे! आहाहा! काय सांगावें हें कृत्य सर्वांस इतकें प्रिय व मान्य झालें होतें कीं, ह्या सत्कृत्याबद्दल सर्व जण 'फेलन्बर्ग' ची वाहवा करीत, व त्याणें सांगितलेल्या उपदेशपर सर्व गोष्टी ते नीट मन लावून ऐकत. वाचकहो, असल्या आनंदाचा दिवस आपल्या इकडे उगवेल काय? तेथें मोठ्या उत्साहानें जसे लोक जमत त्याप्रमाणें आपले लोक एकत्र जमून ह्या महत्कल्याणकारक कृत्याचा जेव्हां विचार करूं लागतील तेव्हां आपल्या देशाचें नशीब उदयास आलें असें खचीत समजलें पाहिजे.

इतक्या काळांत या नार्मल स्कुलाची सर्व युरोप खंडांत प्रसिद्धी झाली. व सन १८१० पासून १८१७ पर्यंत रशिया, जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांतून पुष्कळ विद्यार्थि तेथें शिकण्यास आले. व निरनिराळ्या देशांतील सरकारांनीं येथील गरीब लोकांच्या शाळेची व्यवस्था पाहाण्याकरितां आपले वकील पाठविले. व अशा रीतीनें त्या कामाची एक सारखी भरभरच होत गेली.

---

( मागील पृष्ठावरून. )

शिक्षक शाळांतून अनेक पंतोजी तयार होऊन विद्या प्रसारार्थ बाहेर पडतात, व तेणेंकरून शिक्षणाचे कामास मोठी मदत होते. छापणें सुरेख असलें म्हणजे वाचणाऱ्यांस समाधान वाटून ते मोठ्या प्रेमानें पुस्तकें वाचतात, त्याचप्रमाणें येथें उत्कृष्ट शिक्षक तयार झाल्यास फार उपयोग होतो. सार्वजनिक शिक्षणाचे प्रसारास वरील शिक्षक शाळा अत्यंत अवश्यक आहे म्हणून अशा शाळांचें महत्व मोठें. अशाच शाळांस 'नार्मलस्कूल' किंवा 'ट्रेनिंग कालेज' असें म्हणतात.

*फेलन्बर्ग याचें राहाण्याचें गांव.

यानंतर कांहीं दिवसांनीं त्याणें एक मुलींची शाळा काढली, व तिजवर शिक्षकाचे जागीं त्यानें आपल्या एका मुलीची योजना केली. इतक्या वेळांत वर सांगितलेली शेतकीची शाळा फार वाढली. म्हणून त्याकरितां एक नवी इमारत बांधली. तीही पुरेना. सबब दुसरी एक ढोलेजंग इमारत तयार केली. तींत शिक्षक व विद्यार्थि यांच्या आरोग्य रक्षणाचे संबंधानें व दुसऱ्या सर्व सोयी जितक्या हव्या होत्या तितक्या सर्व केल्या.

सन १८२७ सालीं मध्यम प्रतीचे लोकांस व्यवहारिक व कला कौशल्यांचें शिक्षण देण्याकरितां त्याणें एक शाळा घातली. तींत कांहीं दिवसांनीं सर्व स्वित्सरलंड देशांतील लोकांचीं मुलें येऊं लागलीं.

अशा रीतीनें ह्या परोपकारी गृहस्थानें हळू हळू सर्व प्रकारच्या शिक्षणाचें बीजारोपण केलें. व ह्या गोष्टी करण्यांत त्याचा मूळचा उद्देश पुष्कळ अंशानें सिद्धीस गेला. प्रत्येक देशांतील श्रीमान व शहाण्या मनुष्यांनीं हें उदाहरण घेण्याजोगें आहे. व या मनुष्याचा कित्ता पूर्णपणें वळविण्यास योग्य आहे. मनुष्य जातीचें खरें कल्याण करण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांस आपल्या संपत्तीचा, ज्ञानाचा आणि शारीर श्रमाचा उपयोग अशा रीतीनें करण्यापेक्षां दुसरा कोणताही मार्ग अधिक श्रेयस्कर नाहीं. हें जाणून आमच्यांतील प्रत्येक परोपकारी मनुष्य वरील मजकूर वाचून या कामीं यथाशक्ति प्रवृत्त होईल अशी आह्मास फार आशा आहे.

सन १८४६ सालीं 'फेलन्बर्ग' हा मरण पावला. त्या वेळेस त्याचें वय सुमारें ७२ वर्षांचें होतें. त्याणें ह्या उद्योगास आरंभ केला तेव्हां त्याचें वय ३१ वर्षांचें होतें. ह्या लोकशिक्षणाच्या उद्योगांत त्याणें आपल्या वयाचीं सतत ४० वर्षें घालविलीं. हा मेल्यानंतर त्याच्या मुलामाणसांनीं ह्या शाळा चालविण्याचें काम बंद केलें. तथापि ह्या कृत्याची योग्यता सर्व लोकांस पक्की समजून आल्यामुळें शिक्षणाचा क्रम बंद न होतां पुढें वाढतच गेला. ह्या शाळा व त्यांची व्यवस्था ह्या संबंधानें युरोप खंडांतील निरनिराळ्या देशांत आजपर्यंत १०० रिपोर्ट प्रसिद्ध झाले आहेत. हा मरण पावला तरी त्यानें पेरलेल्या गोष्टींचें बीज लोकांत पूर्णपणें रुझल्यामुळें ह्या कार्यास धक्का बसला नाहीं. त्याणें आ-

पल्या देशावर तर काय पण सर्व मानव जातीवर मोठा उपकार केला आहे. म्हणून जोंपर्यंत निरनिराळ्या ठिकाणीं शिक्षण क्रम चालू राहील तोंवर त्याचें नांव चिरकाल राहील.

देशाची सुधारणा होण्यास सार्वजनिक शिक्षण अत्यंत हितावह आहे. व तें अनुभव सिद्ध आहे असें वरील उदाहरणावरून वाचकांचे लक्षांत आलेंच असेल. परंतु याहीपेक्षां दुसरें एखादें मोठें उदाहरण समजल्यास ज्यास्त समाधान होईल.

युरोप खंडांत स्वित्सरलंडचे जवळच एक देश आहे, त्यास प्रुशिया किंवा जर्मनी असें म्हणतात. देशाची स्थिति सुधारण्याचे कामीं सार्वजनिक शिक्षणापासून केवढी मदत होते, हें ह्या देशाच्या इतिहासावरून पूर्णपणें दिसून येईल. ह्या देशाला लागूनच फ्रान्स म्हणून दुसरा एक देश आहे. त्या देशांशीं हद्दीचे संबंधानें याचा नेहेमीं तंटा असे. सन १८०६ सालीं ह्या दोघांची मोठी लढाई झाली. तींत फ्रेंच लोकांचा बादशहा ' नेपोलियन बोनापार्ट ' याणें प्रुशियाचा पूर्ण पराभव केला. त्याचा मोड झाल्यावर राहिलें साहिलें सर्व सैन्य एका आठवड्याचे आंत शत्रूचे हातीं लागलें. ' नेपोलियनानें ' *बर्लिन शहरांत छावणी दिली. व तेथून नेण्याजोग्या अशा जितक्या मौल्यवान वस्तु होत्या त्या सर्व लुटून नेल्या. सन १८०७ सालीं उभय देशांचा तह झाला. त्यांत प्रुशियाचें अर्धें राज्य शत्रूकडे गेलें. व दहा कोट रुपये खंडणी द्यावी लागली. शत्रूनें प्रुशियाचा इतका नाश केला कीं, त्यांत शाळांच्या खर्चाकरितां तोडून दिलेल्या जमिनीही जप्त झाल्या. व दंड भरण्याकरितां सरकारास दुसऱ्या देशांतून कर्ज काढावें लागलें.

संकटें आल्यानें मनुष्य सावध होतो, व झालेल्या गोष्टीस पुष्कळ अंशीं आपणच कारण आहों असें त्यास वाटूं लागतें. मग होऊन गेलेले दोष पुनः तरी आपले हातून होऊं नयेत ह्मणून जपूं लागतो. एखाद्या देशावर संकट ओढवल्यास त्यांतील सर्व लोकांची वृत्ति अशीच होते. त्याप्रमाणें प्रशियांतील सर्व लोकांची वृत्ति बनून गेल्यामुळें त्या वेळीं सर्व रयतेनें सरकारास फार मदत केली. स्त्रियांनीं आपल्या अंगावरचे दागिने काढून सरकारास दिले, व त्या ऐवजीं त्यांस लोखंडी

* जर्मनची राजधानी.

डागिने देण्यांत आले. ते अजूनही पुष्कळ ठिकाणीं कायम आहेत. त्यांस आज मोठ्या मौल्यवान रत्नापेक्षांही ज्यास्त असा मान देताहेत. अशा ऐन अडचणीच्या वेळीं त्याणीं सार्वजनिक शिक्षणाचे कामास आरंभ केला. आणि स्वित्सरलंडांत 'पेस्टालोजीच्या' शाळेंत शिक्षकाचें काम शिकण्याकरितां त्यांनीं कांहीं लोक पाठविले. त्या संबंधानें प्रुशियाच्या प्रधानाकडून एक पत्र 'पेस्टालोजीस' गेलें त्यांत मजकूर होता तो असा. "हें काम सरकारचें व स्वतः राजे साहेबांचें आहे. मोठ्या अनर्थापासून देशाची सुटका करणें फार कठीण असून, लोकांना शिक्षण देण्याचे कामांत पूर्ण सुधारणा झाल्याशिवाय तें होणारच नाहीं अशी आमची खात्री आहे." याशिवाय ह्या शिक्षणाच्या कामांत त्याणीं दुसऱ्या पुष्कळ गोष्टी केल्या. त्यांत त्याच्या नार्मल स्कुलांची व्यवस्था फार उत्तम आहे. तिचें एकटें *वर्णन करूं लागल्यास एक स्वतंत्र ग्रंथ होईल.

सर्व प्रकारचें शिक्षण लोकांस देण्याकरितां प्रुशिया देशांत निरनिराळ्या ठिकाणीं शाळा घातल्या आहेत. शिवाय तेथें असा एक कायदा आहे कीं, मुलाचें ( मुलगा असो कीं मुलगी असो ) वय ६ वर्षांचें झालें कीं तेव्हांपासून तें १४ वर्षांचें होई तोंपर्यंत त्याचे बापानें त्यास शाळेंत घातलेंच पाहिजे. किंवा घरीं तरी शिक्षण दिलें पाहिजे. ह्या दोन्ही गोष्टी जो करणार नाहीं त्यास सरकारांतून दंड होतो, परंतु शिक्षणापासून आपल्या मुलांचें फार कल्याण होतें अशी सर्व मनुष्यांची पक्की खात्री झालेली आहे. म्हणून वरील कायद्याचा अम्मल बजावण्याचा प्रसंग सहसा येत नाहीं. प्रुशिया देशांत सार्वजनिक शिक्षणाचा क्रम सुरू

---

* ही व्यवस्था व ह्या शाळांच्या संबंधानें दुसऱ्या कांहीं गोष्टी इतक्या अगत्याच्या व मोहक आहेत कीं, वरील मजकूर लिहितांना आमचा हात सहज तिकडे वळतो, परंतु तसें केल्यानें पुस्तकाचा विस्तार फार वाढून तें लोकांस थोड्या किमतींत मिळावें हा आमचा मुख्य हेतु सिद्धीस जाण्यास अडचण पडेल. याकरितां लेखणी आटोपावी लागते. तथापि ही अल्प सेवा वाचणाऱ्यांच्या पसंतीस पडल्यास व कोणाकडून कांहीं सूचना आल्यास अशा प्रकारची अल्प स्वल्प सेवा करण्यास हा लिहिणारा एका पायावर उभा आहे, व हा लेख लोकांस रुचून पुस्तकरूपानें पुनः लोकांपुढें येण्याचा प्रसंग आल्यास फार समाधान वाटेल.

झाला तो अजूनपर्यंत एकसारखा चालू आहे, व त्या कामांत फार सुरेखपणा येऊन अजून त्याचें पुढें सरण्याचें काम फार वेगानें होत आहे. त्या देशांत प्रत्येक मनुष्यानें कांहीं काल लष्करी काम शिकण्यांत घालवावा असाही त्यांचा एक कायदा आहे. त्यापासून त्या देशास किती उपयोग होतो हें सन १८७० सालीं त्याणीं फ्रेंच लोकांबराबर मारलेल्या लढाईच्या हकीकतीवरून प्रसिद्धच आहे.

मनुष्य स्वभावांत एक गोष्ट विलक्षण दिसते ती ही कीं, मनुष्याचें ज्ञान जसजसें वाढत जातें तसतसे त्याचे परस्परांतील तंटे कमी होतात, व झाले तरी ते योग्य प्रसंगीं एकमेकांस मदत करितात. सकृतदर्शनीं हें विलक्षण व असंभाव्य दिसतें, परंतु अनुभवांतीं हें खरें आहे अशी खात्री होते. बायका व मुलें ह्यांचे परस्परांशीं तंटे फार होतात हें आपण नेहेमीं पाहातों, पण तींच मुलें जरा मोठीं व समजदार झालीं म्हणजे तंटे कमी होऊन पूर्वींच्या कृतीचा त्यांस खेद वाटतो. ही गोष्ट पुष्कळांचे अनुभवास आलेली असेल, व हाच नियम सर्वत्र दृष्टीस पडतो, हें पुढील गोष्टीवरून चांगलें दिसून येईल.

फ्रान्स व प्रुशिया या उभयतांचें परस्परांशीं फार वैमनस्य असल्यामुळें ते एकमेकांच्या नाशास निरंतर प्रवृत्त असतात हें सर्वांस ठाऊक आहे. एकदां कांहीं विशेष कारणामुळें वरील वैमनस्याची आग चेतण्याची वेळ आली होती व आतां ह्या दोघांची खास लढाई जुंपते असेंही सर्वांस वाटलें, परंतु इतक्यांत एक चमत्कारिक गोष्ट घडून आली. प्रुशियांतील शिक्षणपद्धति फार चांगली असें कळल्यावरून फ्रान्स देशाच्या रयतेनें व सरकारानें मिळून प्रुशिया देशांत एक वकील पाठविला. त्यांचा मूळ उद्देश असा होता कीं, तेथें सार्वजनिक शिक्षणाचे संबंधानें काय काय व्यवस्था आहे ती पाहून त्याबद्दल त्याणें फ्रेंच सरकारास रिपोर्ट करावा. यावरून समजूत वाढल्यानें तंटे भांडणें कमी होतात ह्या म्हणण्यास फार बळकटी येते. असो, त्या वकिलानें रिपोर्ट केल्यानंतर फ्रान्स देशांत सार्वजनिक शिक्षणाचा फार प्रसार झाला. सन १८७० सालच्या लढाईनंतर ह्या शिक्षणापासून फ्रान्स देशास मोठाच उपयोग झाला. तो हा कीं, लढाईच्या दंडाबद्दल २०० कोट रुपये शत्रुस खंडणी द्यावी लागली, ती त्याणीं दिली इतकेंच नाहीं, तर देशांतील सर्व मनुष्यांचें शिक्षणाच्या योगानें ज्ञान वाढलें अस-

त्यामुळें त्या सर्वांनीं कंबरा बांधल्या, व अतोनात श्रम करून थोड्या दिवसांत आपलें ऐश्वर्य परत मिळविलें. केवढी अचाट शक्ती ही! तेथल्या लोकांस ज्ञान नसतें तर राजा कितीही शहाणा असता तरी त्याचे हातून ही गोष्ट झाली असती काय? कधींही झाली नसती.

या मजकुरावरून सार्वजनिक शिक्षणापासून देशाचें फार हित होतें व ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे येवढें सिद्ध झालें, परंतु येवढ्यानें आमचें कार्य होत नाहीं; कारण आम्ही येथेंच थांबलों तर ' उंदरानें मांजराचे गळ्यांत घांट बांधावी ' असें म्हटल्यासारखें होईल. तर आमच्या स्थितीस ह्या गोष्टीचा उपयोग कसा होईल हा प्रश्न येतोच. शिवाय कोणी असेंही म्हणेल कीं, ' महाराज आपण म्हणतां हें सर्व खरें, परंतु असें शिक्षण देण्याचें काम इंग्रज सरकारानीं चालू केलें आहे, व त्यापासून झालेला उपयोगही आम्हास दिसत आहे. सरकारी शाळांत शिकलेले लोक फार हुशार होतात, त्यांची समजूत वाढते, लोकांचें कल्याण करावें अशा ते गप्पा मारतात, पण त्यांची योग्यता किती म्हणाल तर व्यवहार म्हणजे काय व तो कशाशीं खावा हेंही त्यांस ठाऊक नसतें. सरकारी नौकरी शिवाय दुसरा धंदा कसा करावा ह्याचें त्यांस मोठें गूढ पडतें. स्वतःचें पोट भरण्याची ज्यांस मोठी पंचाईत, त्यांचे हातून लोकांचें कल्याण कसें होईल? चार परीक्षा झाल्या तरी व्यवहार शिकावयास ओनामाच गिरवावा लागतो. असे लोक देशाचें हित तें काय करणार? व असें आहे तर ' सार्वजनिक शिक्षण सार्वजनिक शिक्षण असा × × ध्वनी केल्यानें देशाचा फायदा कसा व्हावा ' हे प्रश्न आजपर्यंत पुष्कळांचे कानीं पडले असतील व त्यांस कांहीं वेळ निरूत्तरही व्हावें लागलें असेल परंतु वाचकहो, थोडा विचार कराल तर असें होणार नाहीं. तुम्ही म्हणतां ह्या गोष्टी सर्वथैव खऱ्या आहेत. कारण त्या नित्य डोळ्यांपुढें दिसतात. परंतु एवढ्यावरूनच सार्वजनिक शिक्षणाचा उपयोग होणें आम्हास अशक्य असें समजणें मात्र अविचाराचें होईल. पाहा आपण घरोघर अग्नीवर अन्न शिजवितों, त्या वेळेस पुष्कळांचे हात भाजतात, अग्नीच्या योगें कितेकांचें याहीपेक्षां फार मोठें नुकसानही होतें, परंतु एवढ्यावरून चुली पेटवून स्वयंपाक करणें सर्वथा गैर असें कोणी तरी म्हणेल काय? त्याचप्रमाणें वरील सरकारी शाळांतून हल्लीं जें शिक्षण मिळतें त्याचे परिणाम शंकाकारांच्या म्हणण्याप्रमाणें होतात खरे, परंतु तेवढ्यावरून सार्वजनिक

शिक्षण सर्वथां अश्लाघ्य असें म्हणणें गैर होईल. कारण हा दोष सरकारी शाळांतून जे विषय शिकवितात त्या पद्धतीचा होय. सार्वजनिक शिक्षणाचा नव्हे. म्हणून तो दोष काढून त्या जागीं योग्य पद्धत घातली असतां वरील प्रकार नाहींसा होईल, आणि सार्वजनिक शिक्षणापासून होणारें हित सर्वांचे अनुभवास येईल.

इतकें झालें तरी आणखी एक मोठा प्रश्न येतोच. सार्वजनिक शिक्षण सर्वथैव योग्य खरें, परंतु त्याचा प्रसार करणें एक किंवा दोन व्यक्तींचें काम नव्हे. आतां याजवरही समाधान आहे. आज आपल्या हिंदुस्थानांतले लोक दरिद्री आहेत खरे, परंतु भगवंताच्या दयेनें अशा महत्कृत्यास मदत करण्याचें ज्यांचे आंगीं मोठें सामर्थ्य आहे असेही अजून पुष्कळ लोक आहेत. आमचेकडे शिंदे, होळकर, गायकवाड, जयपूर, कोल्हापूर, त्रावणकोर, म्हैसूर, हैदराबाद इत्यादि अनेक संस्थानें आहेत. ह्यांस पुष्कळ गोष्टी स्वतंत्रपणें करण्याचा पूर्ण अधिकार आहे. ही गोष्ट करण्याचें त्यांचे मनांत आल्यास ती पूर्णपणें अमलांत आणण्यास त्यांस केंसभरही जड जाण्याचें कारण नाहीं. अशा कृतीनें त्यांस व त्यांचे प्रजेस फार उपयोग होईल हें वर दाखविलेंच आहे, परंतु या कृत्याची पूर्ण योग्यता त्यांस अनुभवाअंतीं फार उत्तम रीतीनें समजून येईल.

संस्थानिक व सरदार लोकांशिवाय बाकीच्या एकंदर लोकांचा आणखी एक मोठा वर्ग राहिला आहे. त्याचा सहजच प्रश्न येईल कीं, ही गोष्ट करणें आह्मास अशक्य आहे. तर आपले पांडित्याचा आम्हास उपयोग काय? परंतु यांसही निराश होण्याची जरूर नाहीं. कारण भगवंताचे दयेनें नुकताच एक ठराव झाला आहे. त्याचे योगानें इंग्रज सरकारचे मुलखांतील प्रजेपैकीं साधारण मनुष्यास देखील या गोष्टीचा विचार करून ती अमलांत आणण्याचा हक्क आला आहे. हें ऐकून कदाचित् कोणास आश्चर्य वाटेल, परंतु तसें होण्याचें मुळींच कारण नाहीं, आपल्या देशांत राणी सरकारचे एक प्रतिनिधि राज्यकारभार चालवीत असतात. त्यांस गवरनर जनरल अथवा व्हाइसराय असें म्हणतात. त्या जागेवर हल्लीं जे गृहस्थ आहेत ते फार सूज्ञ असल्यामुळे रयतेचे कल्याणाकरितां त्यांणीं अनेक गोष्टी केल्या. त्यांत मिठावरचा कर कमी केला, हत्यारांच्या कायद्यांत फेरफार केला. हा प्रकार सर्वांस महशूर आहेच. आणखी

अशाच प्रकारचा त्यांणीं दुसरा एक ठराव केला आहे त्यामुळें सर्व लोकांवर त्यांचे मोठे उपकार झाले आहेत. इंग्रज सरकारच्या मुलखांत अनेक मोठालीं शहरें आहेत. तेथल्या लोकांस सोयीवार अशी व्यवस्था करण्याकरितां तेथील रहिवाशांची एक निवडक मंडळी असते. तिचें नांव 'म्युनिसिपालिटी' त्या गांवच्या व्यवस्थेचें काम ह्या मंडळीचे हातून होतें. आजवर सभासद निवडण्याचा हक्क सरकारी अधिकाऱ्यांकडे असे, परंतु लार्ड रिपन साहेबानीं जो नवा ठराव केला त्यावरून कमेटींतले $\frac{2}{3}$ दोन तृतियांश सभासद निवडण्याचा अधिकार या शहरचे लोकांस मिळाला आहे. ह्या मंडळीचे हातून शहर संबंधी अनेक गोष्टींची व्यवस्था होते, त्यांत तेथील लोकांच्या सोयीकरितां सार्वजनिक शिक्षणाचें काम त्यांच्याकडेसच येतें. तेथील शाळांकडे सरकार जो खर्च करतें तो खर्च आतां म्युनिसिपालिटयांच्या हातून होईल. यामुळें पूर्वींपेक्षां नवा खर्च न करितां तेथील लोकांस योग्य दिसेल तशी शिक्षणाची सोयीवार व्यवस्था करतां येईल. या शिवाय ज्यास्ती खर्च करणें झाल्यास तो वसूल करणें लोकांचे खुषीवर आहेच. यामुळें साधारण लोकांचे हातीं देखील मोठा अधिकार आला आहे.

मनुष्याच्या मनाचा असा एक धर्म आहे कीं, एखादी फायदेवाईक गोष्ट झाली अगर जें कार्य होण्यास फार श्रम लागतात तें एकाएकी सिद्धीस गेलें तर त्यास फार आनंद होतो. परंतु अशा वेळेस त्याचें मन चंचल होऊन त्याचा स्वस्थपणा बिघडतो. यामुळें अशा प्रसंगीं त्याचे हातून अविचार होण्याचा संभव असतो. म्हणून आतां सर्वांनी फार सावध राहिले पाहिजे. नवा अधिकार प्राप्त झाल्यामुळें मनुष्यास आनंद वाटणें हें अगदीं साहजिक आहे, परंतु नव्या अधिकाराबरोबरच एक नवी जबाबदारी आपले शिरावर आली हें सर्वांनीं ध्यानांत ठेविलें पाहिजे. राजा प्रजेवर अंमल चालवून राज्यकारभार करतो, परंतु त्याबरोबरच सर्व प्रजेचें कल्याण करण्याची जबाबदारी त्याचे शिरावर येते. ही गोष्ट आपलेकडील लहान मोठया संस्थानिकांस व जहागिरदारांस सर्वथैव लागू आहे हें त्यांणीं आपल्या मनांत नेहेमीं पक्के वागविलें पाहिजे. म्हणून वर सांगितल्याप्रमाणें सार्वजनिक शिक्षणाची चांगली सोय करून आपल्या प्रजेस त्याचा लाभ देणें हें त्यांचें मुख्य कर्तव्य आहे. त्याची हयगय

केल्यास परमेश्वराजवळ त्याचा जबाब द्यावा लागेल. वाचकहो, ही जबाबदारी वरील नव्या ठरावामुळें तुम्हावरही अंशत: आल्यामुळें त्याबद्दल तुम्ही योग्य व्यवस्था न केल्यास तुम्हासही जबाबदारीच्या पिंजऱ्यांत उभें राहावें लागेल.

युरोप व एशिया ह्या दोन्ही खंडांत कोट्यावधी लोक राहतात, व सृष्टि नियमाप्रमाणें ते एकाच मनुष्य जातींत मोडतात, परंतु ह्या दोन्ही खंडांतील लोकांच्या कृतीवरून त्यांचें साम्य पाहूं लागल्यास दोघांत मोठें अंतर दिसतें. ह्या गोष्टीच्या स्पष्टीकरणार्थ एशियांतील आपल्या हिंदुस्थान देशाच्याच इतिहासाकडे पाहिलें असतां त्यांच्यांत व आमच्यांत किती फरक आहे तो ढळढळीत दिसूं लागतो.

एकादा श्रीमान व शहाणा पुरुष सगळ्या पृथ्वींतलीं सुंदर फुलझाडें, उत्तम फळझाडें व अशाच सर्व उपयुक्त वनस्पती गोळा करून आपल्या बागेंत लावतो, आणि मोठ्या काळजीनें त्यांस वाढवून पुढें त्यांचा खरा उपयोग करून घेतो. त्याचप्रमाणें सध्यां युरोपखंडांतील बहुतेक देशांत शिक्षण पद्धतीचें उत्कृष्ट बीजारोपण झालेलें आहे. मोठेपणी संसारांत ज्या ज्या गोष्टींची व गुणांची नेहेमीं जरूर पडते त्यांचें ज्ञान सामान्य शिक्षणाबरोबरच मुलांस प्राप्त व्हावें, अशी योजना करून एकंदर देशाला ज्या कसबाची अगर गुणाची अपेक्षा असेल त्यांमध्येंही पुष्कळ लोक चांगले तरबेज करतां यावे, अशी एकंदरीच्या शिक्षणांत मोठ्या खुबीनें तजवीज करून ठेविली आहे. यामुळें छापखान्यांत टैप जुळून तयार करतांच हव्या त्या मजकुराच्या पाहिजे तितक्या प्रती लवकर काढतां येतात. त्या प्रमाणें हव्या त्या गुणांचीं पाहिजे तितकीं माणसें हुकमा बराबर उभीं राहतात. युरोपांत ह्या अत्युत्तम शिक्षण क्रमानें तयार झालेलीं प्रधान, मुत्सद्दी, कारकून वकील, कारागीर, शेतकरी, खलाशी, सेनापती, व शिपाई इत्यादि अनेक गुणांची मनुष्यें हवीं तितकीं पाहिजे त्या वेळेस मिळूं शकतात. म्हणून तिकडल्या लोकांनीं हातीं घेतलेलीं कामें बिनधोक शेवटास जातात. कारण परले मध्यंतरी कांहीं अपघात झाला तरी त्यास ते न जुमानतां पाठी मागलीं माणसें बेधडक आपलें इष्टकार्य सिद्धिस नेतात. यामुळें त्यांच्या देशावर वांकडा डोळा करून बघण्याची सुद्धां कोणास छाती होत नाहीं. सुशिक्षणाचें केवढें सामर्थ्य हें ! ! ! असो.

असल्या शिक्षणाची सोय आमच्याकडे कितपत आहे? युरोपांतील देशांपेक्षा अनेक गुणांत आम्ही फारच मागें आहों म्हणून व्यवहारिक गोष्टींत तरी त्यांचें अनुकरण करावें, म्हणून पुष्कळ लोक एकत्र जमून ह्या विषयाची वाटाघाट किंवा विचार तरी कांहीं करतों का? कांहीं नाहीं. आमच्या देशभक्तांस असें वाटतें कीं, माझी व माझ्या कुटुंबाची तुनुमुनु गुजराण झाली म्हणजे पुरे. बाजारच्या भाकरी भाजून आपल्यास काय लभ्यांश, असें ह्मणणारेच फार. आतां कांहीं थोडके लोक शब्दांनीं असें बोलत नाहींत, तरी ह्यांची त्यांची कृती सारखीच. आमच्या लोकांत स्वदेशाभिमानाचा असला खडा पाहारा जागत असतां आमचें कल्याण कधीं व कसें होईल ह्याचा अजमास वाचणाऱ्यांनींच करावा.

पाहा आमच्या देशांत बुद्धीमान, शहाणे, व विद्वान वगैरे पुष्कळ लोक होऊन गेले. परंतु एखाद्या कामांत दैवयोगानें किंवा अंग स्वभावानें एखादा पुरुष निपजला तर तोच फार उदयास येऊन त्याची वाहवा होते. परंतु तो नाहींसा झाला कीं लागलीच त्या गुणाचा अंधेर पडतो. गेल्या दोनशें वर्षांपूर्वी शिवाजी महाराजांचा उदय होऊन सगळ्या हिंदुस्थानावर त्यांचा उजेड पडला; पण त्यांचा अंत होतांच तसल्या गुणाची अमावास्या झाली. पुढें थोरल्या बाजीरावानें कीर्तीचा ध्वज उभारला, तरी त्याचे मागें लवकरच अभ्रें आलीं. त्याजवर सोनपत-पानपतच्या लढाईंत नाना भाऊनीं मोठी उमेद दाखविली, परंतु लढाईंत भाऊ साहेब पडतां क्षणीच लाखो लोक होते ते सगळे थिजून पळत सुटले, त्यामुळें देशाची किती दुर्दशा झाली ती सर्वांस विदीतच आहे. शेवटीं नाना फडणीसानीं राजकीय चातुर्यांत मोठें नांव मिळविलें. तथापि त्यांचा अंत होतांच सगळ्या राज्याचा चुराडा झाला. याप्रमाणें आमचे कडील सर्व लोकांची सर्व प्रकारच्या कामांत अशीच स्थिति आहे. ह्याचें कारण काय? तर आम्हास सुखाचीं साधनें आपोआप मिळालीं तर तेवढींच मात्र घेतों. तीं वाढविण्याची काळजी धरून उपयुक्त ज्ञान प्रसारार्थ सर्व लोकांस उत्तम सार्वजनिक व्यवहारशिक्षण देण्याची सोय करीत नाहीं हेंच होय. एरवीं स्वभावतः शारीर व मानसीक गोष्टींत युरोपियन लोक व आम्ही अगदीं सारखे. असें असतां करामतीनें पाहिलें तर ते आमच्यापेक्षां फार पुढें,

आणि आम्ही फारच मागें. असला फरक पडण्यास कारण काय तें हेंच कीं, युरोपांत सार्वजनिक शिक्षणाची सरकारानें व लोकांनीं फार चांगली व्यवस्था केल्यामुळें सर्व लोकांत ज्ञानाचा फार फैलाव झाला, व तेणें-करून देशांतले सगळेच लोक ज्ञानबलसंपन्न झाले. तेव्हां अर्थांतच सर्व उपयुक्त गुणांच्या तेथें खाणीच वाढत चालल्या. आणि आमच्या देशांत तसल्या शिक्षणाची अगदीं हेळसांड झाल्यामुळें अज्ञान वाढलें. अं-धकार पडला, व देशाचा देश नंगली माणसांनीं भरून गेला. अशा स्थितींत परदेशच्या शाहाण्या व बलाढ्य लोकांनीं आमच्यावर स्वाऱ्या केल्या, आम्हास झोडलें, व आमच्या कडील द्रव्याच्या राशीच्या राशी लुटून नेल्या तर ह्यांत आश्चर्य काय ? उजेडा पुढें अंधार टिकत नाहीं. त्याच-प्रमाणें ज्ञानी मूर्खांचा मोड करतात. ह्या गोष्टीचा आमच्या देशांतील सर्व लोकांनीं विचार करावा हें त्यांचें कर्तव्य आहे.

आतां दुसरी बाजू युरोपियन लोकांची पहाणें असल्यास आमच्या इंग्रज लोकांचेंच उदाहरण आपल्या डोळ्यांपुढें आहे. थोड्या वर्षांपूर्वीं ह्या देशांतील त्या वेळचे गवरनर जनरल लार्ड मेयो साहेब अकस्मांत मारले गेले. तरी आमचेकडील नारायणराव पेशव्यांच्या मरणानें झालेल्या घोटाळ्या सारखा कांहींच प्रकार झाला नाहीं. त्यांचें काम चालविण्यास पाठीमागलीं माणसें पूर्ण लायख व तयार. त्याचप्रमाणें सन १८५७ सालच्या बंडांत इंग्रज लोकांच्या पुष्कळ कत्तली झाल्या, मोड झाले, व नाना फडणीसासारखे राजकारणी व शिवाजी सारखे शूर असे पुष्कळ मोहरे पडले; तरी त्यांच्यांत पूर्व शिक्षणामुळें जें बळ व इभ्रत आलेली होती तिनें पाठीमागल्या लोकांस केंसभर मागें सरकूं न देतां अधिकाधिक आवेश व हिंमत, आणली म्हणूनच त्यांजवर आलेलें येवढें प्रचंड काहूर नाहीं-सें करून पुनः त्यांनीं पूर्ववत सर्व व्यवस्था केली. कालच्या आफ-गाणीस्थानच्या लढाईंत तरी काय वळण हेंच. ह्यांचे पुष्कळ आफिसर मेले, व अडचणीचे प्रसंग आले तरी ठरलेली शिस्त सोडली नाहीं. एक सरदार मेला तर पाठीमागला तेथें दुसरा तयार. तोही गचावला तरी त्या सरदाराचें काम चालविण्याच्या लायखीचीं अशीं शेंकडों माणसें जशीं काय तयारच करून ठेवलीं आहेत. ही लायखी केवळ आंगची नव्हे. तर लहानपणापासून दिलेल्या उत्तम शिक्षणाची होय. म्हणून ते मोठाले

कठीण प्रसंग आले तरी न घाबरतां धैर्यानें ठरून शांतपणानें आपला उद्देश पूर्णपणें सिद्धीस नेतात. असल्या बिकट प्रसंगांत आमचे लोक सांपडल्यास त्यांची किती गाळण होऊन दुर्दशा होते हें वर उदाहरणांनीं दाखविलें आहे. इतकेंच नाहीं तर आपण असल्या गोष्टींचा दररोज साक्षात् अनुभवही घेतच आहों. तात्पर्य आम्ही व युरोपियन लोक माणूसपणानें सारखे असतां त्यांच्या आमच्यांत जें येवढें करामतीचें महदंतर पडलें आहे, तें आम्ही काढून टाकण्याचा दृढ निश्चयानें प्रयत्न आरंभून तो सतत चालू ठेवल्यास कालांतरानें तरी आम्ही त्यांच्या जवळ जवळ जाऊं.

मित्रहो, आपल्या हिंदुस्थान देशांतील व युरोपियन राष्ट्रांतील लोकांमध्यें मुख्य न्यूनाधिक्य कोणतें, तें कशानें येतें, व त्याचे परिणाम काय होतात हें संक्षेपानें सांगितलें. त्यावरून जर कांहीं तुमच्या मनांत प्रेरणा होत असेल तर ज्या सार्वजनिक शिक्षणाची आमच्यांत फार वाण आहे ती नाहींशी करण्याच्या प्रयत्नास लागण्याचा हा समय फारच चांगला आहे. तो वांयां दवडणार नाहीं असें आम्ही इच्छितों.

सार्वजनिक शिक्षणासारखीं मोठालीं कामें सुरू करण्यास धामधुमीचा काळ वाईट. त्याच्या आरंभास व प्रसारास देशांत स्वस्थता व शांती असेल तेवढी चांगली. परमेश्वर कृपेनें आज आमच्या देशावर इंग्रजी राज्य असल्यामुळें सर्व लढाया व दंगे धोपे मावळून सर्वत्र शांतता झाली आहे. शिवाय इंग्रज लोक परदेशचे, परजातीचे, व परधर्माचे असतांही त्यांच्या कृपाळू स्वभावानें आमचें होईल तितकें कल्याण करण्याविषयीं ते फार झटताहेत. सर्व दुःखाचें मूळ जें अज्ञान तें नाहींसें करण्याकरितां आम्हास ते ज्ञानामृत पाजीत आहेत. सध्याचे गवरनर जनरल लार्ड रीपन साहेब तर आमचें राजकीय व व्यवहारिक गोष्टींत होईल तेवढें कल्याणच करावें म्हणून विडा उचलल्याप्रमाणें झटताहेत. असा आज हा सोन्या सारखा दिवस उगवला असतां व आमच्या बऱ्यासाठीं परके लोक झटत असतां आम्हीच जर घट्ट डोळे मिटून मुखस्तंभ झालों, किंवा हात पाय न हालवितां थोंटे पांगळे बनलों तर आपली ह्या अज्ञानरूप संकटांतून सुटका कशी होईल? आमचें मायबाप इंग्रज सरकार कितीही दयाळू असलें तरी जन्मवर आम्हास बोंडल्यानें दूध कुठवर पाजील? मुलें मोठीं

होतात तसतशीं आपल्या हातानें जेऊं खाऊं लागतात. आपल्याच पायानें हिंडतात फिरतात; व होतां होतां आईबापांवरला भार नाहींसा करून आपल्याच उद्योग धंद्यावर आपला सर्व गुजारा करतात. अशी जनरूढी आमच्याकडेही चालत असतां ह्याच शिक्षण प्रसाराच्या कांमांत तान्ह्या मुलासारखें अज्ञान व दौर्बल्य धारण करावें हें किती अश्लाघ्य आहे? ज्या शिक्षणानें ज्ञानवृद्धी होऊन पुढें तें नन्मवर उद्योग धंद्यांत उपयोगी पडणार त्याची पद्धति कशी असावी, सध्याच्या चालू शिक्षण पद्धतींत कमीपणा काय आहे, तो दूर करून त्यांत आणखी कोणते फेरफार केले पाहिजेत. इत्यादि अत्यंत अवश्यक गोष्टींविषयीं आम्ही कांहींच बोललों नाहीं. किंवा गुणदोषांच्या संबंधानें होणारें नफा नुकसान सरकारास किंवा सर्व लोकांस कळवून त्यांस जागृत केलें नाहीं तर आह्मास अनिष्ट असणाऱ्या गोष्टी दूर कशा होतील? व अवश्यक गोष्टींचा शिक्षणक्रमांत कसा शिरकाव होईल? तुम्हांस तुमचें बरें होण्याची खरोखर इच्छा असेल तर आपल्या देशांत सार्वजनिक शिक्षणाच्या प्रसाराचा मनोभावानें झटून प्रयत्न करा. म्हणजे तुमच्या सर्व इच्छा पूर्ण होतील.

देशस्थिति सुधारण्यास सार्वजनिक व्यवहारशिक्षण फार अवश्य आहे. म्हणून त्याच्या प्रसारार्थ सर्व लोकांनीं झटलें पाहिजे हें सिद्ध झालें. परंतु येवढ्यानें ह्या लेखास पूर्णता येत नाहीं, म्हणून ह्या कार्याच्या सिद्धी-करतां आतां आपण काय केलें पाहिजे ह्याची दिशा थोडक्यांत मनांत येऊन त्याचा खुलासा होण्याकरितां पुढें लिहिल्याप्रमाणें त्याचे चार भाग केले आहेत.

१. सध्या चालू असलेल्या शिक्षणपद्धतींत न्यूनता कोणत्या आहेत व त्यामुळें विद्यार्थ्यांवर कोणते वाईट परिणाम घडतात हें पहाणें.
२. यापुढें जी शिक्षणपद्धती चालू करणें अवश्य दिसतें तिजमध्यें नव्या गोष्टी कोणत्या घालाव्या, व तेणेंकरून विद्यार्थ्यांवर कोणते चांगले परिणाम घडण्याचा संभव आहे तें सिद्ध करणें.
३. शिक्षणक्रमांत वरील फेरफार करण्याचे कामीं सरकारानें काय करावें व तसें करणें हें सरकारचें कर्तव्य आहे कीं काय हें पहाणें.
४. ह्या संबधानें रयत लोकांचें कर्तव्य कोणतें व तें न केल्यास पुढें परिणाम काय होईल ह्याचा विचार करणें.

ह्या चारी मुद्यांची नीट फोड व्हावी म्हणून त्यांचा आतां क्रमाक्रमानें विचार करूं.

१. **पहिला मुद्दा**--सध्या चालू असलेल्या शिक्षणपद्धतींत न्यूनता कोणत्या आहेत, व त्यामुळें विद्यार्थ्यांवर कोणते वाईट परिणाम घडतात हा होय. म्हणून प्रथम त्याकडे वळूं. विद्येच्या योगानें मनुष्याच्या कल्याणास सर्व प्रकारें साह्य व्हावें. विद्यार्थी स्त्री असो कीं पुरुष असो, अथवा तो गरीब शेतकऱ्याचा, कारागिरीचा, किंवा मोठ्या धनाढ्य श्रीमंताचाही मुलगा असला तरी विद्यालय सोडल्यावर त्याच्या स्थितीप्रमाणें त्यास जो धंदा करावा लागतो त्यास शिक्षणाच्या योगानें चांगली मदत मिळावी हाच विद्याभ्यासाचा मुख्य उद्देश आहे. परंतु तो साधण्या जोगी चालू शिक्षणपद्धतींत करामत दिसत नाहीं. म्हणून विद्यार्थ्यांस व त्यांचे आईबापांस शिक्षणापासून फायदाच आहे असें बिलकूल वाटत नाहीं. गरीब शेतकऱ्यांचीं व कारागिरांचीं मुलें शाळेंत शिकण्यास पुष्कळ जात नाहींत, व त्यांस शाळेंत पाठविणें हें आईबापांस देखील अगत्याचें वाटत नाहीं ह्याचें कारण तरी हेंच, कीं शाळेंत चालणाऱ्या भूगोल, व्याकरण, व इतिहास इत्यादि विषयांच्या अभ्यासाचा पसारा पुढें त्यांच्या धंद्यांत कांहींच उपयोगी पडत नसतो. त्यांस ज्या शेतकामांतील गोष्टींची व कारागिरी कामांतल्या मुख्य भागांची क्षणोक्षणीं जरूर पडते, त्यांतलें एक अक्षर देखील शाळेमध्यें विद्यार्थ्यांच्या कानीं पडत नाहीं, ह्मणून सध्या शाळांतून चालत असलेला विद्याभ्यास त्यांस व्यर्थ वाटतो, इतकेंच नाहीं तर तो आपल्या धंद्याउद्योगास उपद्रवकारक आहे असें ही मनांत येतें; कारण सरकारी शाळांत शिकलेले विद्यार्थी शेतकीच्या किंवा कारागिरीच्या कामास अशिक्षिता इतकेही योग्य न बनतां त्यांपेक्षां ते फार नालायख ठरतात. प्रस्तुतच्या शिक्षणक्रमांत ही मोठी गोम आहे, हें सिद्ध करण्यास हजारों विद्यार्थ्यांचीं उदाहरणें आहेत. वास्तविक पाहिलें तर शिक्षणाचीं पुस्तकें व शिकविण्याचा क्रम लोकस्थितीच्या व संख्येच्या मानानें वेगळाला पाहिजे. कारण आमचेकडील शेतकरी, कारागीर, व त्यांहून अन्य उद्योग करणारे लोक ह्यांची स्थिति, विद्याभ्यास करण्याची ताकद, त्यांस तिची गोडी, व धंद्यांत तिची अवश्यकता एकसारखी नसते. यामुळेंच शेतकऱ्यांचीं व कारागिरांचीं मुलें शाळेंत आधीं

फारशीं येत नाहींत, व जीं थोडीं येतात तीं फार तर वर्ष दोन वर्षें शिकलीं न शिकलीं कीं, लागलींच शाळा सोडून आपल्या शेतांत किंवा कलाकौशल्याच्या धंद्यांत खपण्यास जातात. परंतु अन्य उद्योगांतील लोकांचीं मुलें शाळेंत बरींच वर्षें एकसारखीं अभ्यास करतात. त्यांतले कितेक विद्यार्थी तर युनिवर्सिटीची पदवी मिळाल्याखेरीज विद्येचा पाठलाग सोडीत नाहींत. तेव्हां ह्या दोन्ही प्रकारच्या लोकांची स्थिति समान आहे असें कसें म्हणवेल? खरोखर स्थितीच भिन्न आहे. तर त्यांच्या अभ्यासाचीं पुस्तकें व शिकविण्याची पद्धतही वेगळीच केली पाहिजे. सगळ्यांचीं पुस्तकें व पद्धत सारखी ठेवल्यानें सोयीपेक्षां गैरसोय अधिक होईल, व त्याप्रमाणें आज होतही आहे. पहा, सध्या आमच्याकडे मुळापासून शिक्षणाचीं पुस्तकें व अनुक्रम जो चालत आहे तो सगळ्या लोकांस एकसारखा. स्थिति मानानें दोन तीन प्रकारचा तरी फरक पाहिजे होता. तसा मुळींच नसल्यामुळें व्यवहारांतील धंद्याउद्योगास विद्येची मदत होत नाहीं. तिजपासून उलटा त्यांस उपद्रव होतो. म्हणून सध्याच्या शिक्षणपद्धतीनें शाळांत शिकून तयार झालेले लोक स्वतंत्र धंद्यास अगदीं नालायख ठरतात. त्यांच्यांत काय जें ज्ञान येतें तें केवळ सरकारी चाकरीच्या उपयोगाचें. यामुळें बरेच दिवस विद्याभ्यास करून विद्यार्थी बाहेर पडला कीं, त्यास चाकरीच्याच पाठीस लागावें लागतें. दुर्दैवानें ती मिळाली नाहीं म्हणजे तो फारच फिका पडतो. कारण इतर धंद्यांत तो कुचकामाचा असें ठरलेलेंच असल्यामुळें त्यास कोठेंच थारा मिळेनासा होतो. यामुळें शिकलेल्या लोकांची स्थिति फार भयंकर होते. प्रस्तुत शिकणाऱ्या लोकसंख्येच्या मानानें चाकऱ्या कमी असल्यामुळें उद्योग नाहीं म्हणून पुष्कळ विद्यार्थी रडत बसले आहेत, व असल्या शिक्षण क्रमास व आपल्या नशीबास फार बोल लावीत आहेत. ही गोष्ट फुगवून लिहिली नाहीं. अक्षरशः खरी आहे, असें पुष्कळ वाचणारे अनुभवानें जाणत असतील.

शाळेंत शिकतांना विद्यार्थ्यांस शिकण्याचें ओझें वाटूं नये, पण शिकण्याची हौस व उल्हास वाटावा, म्हणजे विद्यार्थ्यांचीं मनें खुलीं राहून शिकविलेले विषय त्यांचे मनावर लवकर व चांगले ठसतात. अल्पकाळ शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस तर ह्यापासून फारच उपयोग होतो, परंतु असल्या

अवश्य गुणांचा लाभ साधण्याची प्रस्तुतच्या शिक्षणक्रमांत कांहींच तजवीज दिसत नाहीं.

क्रमिक पुस्तकें सुरू झाल्यानें व इतर व्यवस्थेनें विद्या शिक्षणाचे कामांत पूर्वीपेक्षां आलीकडे सुधारणा बरीच झाली आहे खरी, परंतु वर सांगितलेले दोष अद्याप राहिले आहेत, ते दाखविण्याचा प्रसंग आला म्हणून हा लिहिणारा फार दिलगीर आहे.

**२ दुसरा मुद्दा**–यापुढें जी शिक्षण पद्धति चालू करणें अवश्य दिसतें तिजमध्यें नव्या गोष्टी कोणत्या घालाव्या व तेणेंकरून विद्यार्थ्यांवर कोणते चांगले परिणाम घडण्याचा संभव आहे तें सिद्ध करणें हा होय. त्याचा आतां थोडासा विचार करूं. आमच्याकडील विद्यार्थ्यांचे स्थूल मानानें वर्ग केले तर ३ होतात. शेतकरी, कारागीर, व इतर धंद्याचे सर्व लोक. ह्या तिन्ही वर्गांस आरंभापासून शिकविण्याचीं पुस्तकें व पद्धति सध्यां एकच आहे ती मोडून टाकावी, आणि तिचे तीन भाग करावे. त्या प्रत्येक भागास शिकविण्याकरितां विद्यार्थी वर्गांची स्थिति व त्यांचे धंदे उद्योग असतील त्यांस पुढें कांहीं तरी उपयोगी पडेल अशा तत्वांचे धडे योजून तशा प्रकारचीं शिक्षणाचीं पुस्तकें व पद्धति वेगळालीच ठरवावी.

शेतकऱ्यांस शिक्षण देण्याचे भागांत शेतकीचे धंद्यांत विद्यार्थ्यांस पुढें जीं जीं कामें करावीं लागणार त्या त्या प्रसंगाचें व कामाचें वर्णन असावें. शेतकामांत लागणारीं हत्यारें व इतर अन्य साधनें नांगर, पाभार, कुळव इत्यादिकांच्या नांवाचीं व उपयोगाचीं वर्णनें असावीं. त्याचप्रमाणें जमिनीचे प्रकार, पिकांच्या जाती व हंगाम आणि त्यांचे उपयोग इत्यादिकांवर निरनिराळ्या गोष्टी असाव्या. तसेच गुरांच्या जाती, त्यांचे उपयोग, त्यांस रक्षण करण्याच्या रीति, त्यांस होणारे रोग व ते बरे करण्याचे उपाय इत्यादि दाखविण्यांत यावे. सारांश शेतकीच्या कामासंबंधीं जितके प्रसंग व त्या वेळेस जितक्या क्रिया शेतकऱ्यांस कराव्या लागतात त्यांचीं निरनिराळ्या गोष्टींनीं अत्यंत सोप्या भाषेंत वर्णनें लिहावीं, आणि तसल्या प्रकारचीं क्रमिक पुस्तकें करून तीं शेतकऱ्यांच्या मुलांस कांहीं विशेष पद्धतीनें शिकविण्याची सोय करावी. अशा प्रकारची व्यवस्था केल्यास शेतकऱ्यांच्या मुलांनीं सध्या अल्पकाळांत शाळेंत शिकून संपादन केलेलें ज्ञान शाळा सोडल्यावर थोडक्याच दिवसांत मरून जातें तसें होणार

नाहीं; कारण नवीन पुस्तकामध्यें शेतकामाच्याच गोष्टी व प्रसंग त्याणें वाचले असतील त्यांच्याशींच त्याची मोठेपणी साक्षात गांठ पडणार, त्यामुळें त्या ज्ञानास अधिक पुष्टी येऊन तें वाढीसच लागेल. अशा रीतीनें शाळेंत प्राप्त होणाऱ्या ज्ञानाचा लोकांस प्रत्यक्ष उपयोग होऊं लागला म्हणजे सर्व शेतकरी लोक विद्येच्या पाठीस लागून आपल्या शेत कामाची लवकर चांगली सुधारणा करतील.

दुसरा भाग कारागीर लोकांच्या शिक्षणाचा. त्यांच्याकरितां देखील शिक्षणाचीं पुस्तकें व पद्धत स्वतंत्र असावी. कारागीर लोक जीं कामें करतात त्यांत मुख्यत्वें धातु, लांकडें, कापूस, मृत्तिका, इत्यादि पदार्थांवर निरनिराळ्या क्रिया करण्याचे प्रसंग त्यांस फार असतात. त्यांचीं नांवें, त्यांचीं उत्पत्ति स्थळें, व त्यांचा उपयोग कोठें व कसा होतो. त्याचप्रमाणें ते पदार्थ प्राण्यांच्या उपयोगी पडण्याच्या अवस्थेस येऊन पोंचत तोंपर्यंत त्यांचीं रूपांतरें कसकशीं होतात त्याचें यथास्थित वर्णन असावें. वरील पदार्थ तयार करण्यास अनेक प्रकारचीं हत्यारें व विखणें लागतात त्यांचीं नांवें, उपयोग, व अनेक प्रकारचीं कामें करण्याच्या रीति ह्यांचींही वर्णनें सोप्या भाषेनें लिहून त्यांचीं क्रमिक पुस्तकें करावीं, व ह्या वर्गास शिकविण्याची पद्धतीही योग्य प्रकारची वेगळीच ठरवावी. म्हणजे ह्या पद्धतीनें शिकणाऱ्या कारागीर लोकांच्या मुलांस अल्पकाळांत जें ज्ञान प्राप्त होईल तें शाळा सोडल्यावर गळून न पडतां तें उत्तरोत्तर चांगलें वाढीस लागेल, व तेणेंकरून कारागीर लोकांची विद्याभ्यासावर प्रीति जडून त्यांच्या उद्योग धंद्यांतही सुधारणा होत जाईल.

तिसऱ्या वर्गांत शेतकरी व कारागीर खेरीजकरून अन्य उद्योगाचे लोक यावयाचे. त्यांत सर्व प्रकारचा क्रयविक्रय करणारे व्यापारी, नौकर, व दुसरे सर्व अन्य उद्योगाचे लोक, ते बहुतेक शहरवासीच येणार. त्यांच्या अभ्यासाचीं पुस्तकेंही वरच्यापेक्षां भिन्नच असावीं. त्यामध्यें अनेक प्रकारच्या व्यवहाराची माहिती असावी. ह्या वर्गांतलीं मुलें वरील दोन्ही वर्गांपेक्षां अधिक काळ शाळेंत राहण्याचा संभव फार असतो म्हणून ह्यांच्याकरितां जीं क्रमिक पुस्तकें तयार करावयाचीं त्यांत सर्व विषय बरेच विस्तीर्ण असले तरी चिंता नाहीं.

या सूचनेप्रमाणें शिक्षणक्रमाचे विभाग करून त्याचीं पुस्तकें व

पद्धती पृथक केल्यास सर्वच विद्यार्थ्यांस आतांच्यापेक्षां अधिक उपयोग होईल यांत संशय नाहीं. आमच्या देशांत शेतकरी लोकांची संख्या फार मोठी आहे त्या मानानें त्यांच्यांतील शिकणाऱ्या मुलांची संख्या फारच थोडी. हें सरकारानें जाणून शेतकरी लोकांत विद्येचा प्रसार अधिक व्हावा ह्या हेतूनें आलीकडे खेडेगांवांत पुष्कळ नव्या शाळा स्थापण्याचा क्रम सुरू केला आहे. तरी तेथें मुलें जमत नाहींत असा बोभाटा आहे. तो वरील नव्या व्यवस्थेनें दूर होऊन सर्व शेतकरी आपआपलीं मुलें मोठ्या आनंदानें शाळेंत पाठवूं लागतील. कारण ह्या नव्या रीतीनें शेतकरी व कारागीर ह्या दोन्हीं वर्गांच्या लोकांस त्यांच्या धंद्यास उपयोगी पडणारें असें तत्वभूत ज्ञान नवीन शिक्षणक्रमानें पुष्कळ प्राप्त होण्याचा फार संभव आहे. तो लाभ साधण्यास ते हयगय कशी करतील. उघड व सन्नीध फळ दिल्यावर तें टाकून कोण देईल? कदाचित कांहीं दिवस जरी हयगय झाली तरी ह्या नव्या शिक्षणपद्धतीनें खास खास फायदा आहे अशी त्यांची अनुभवानें पक्की खात्री झाली म्हणजे मग ते मोठ्या आनंदानें आपल्या सामर्थ्यानुरूप विद्येच्या पाठीस लागतील. कारागीर लोकांविषयीं देखील हाच नवा मार्ग साह्यकारक आहे असें त्यांस कळून आलें म्हणजे तेही विद्येची पाठ सोडणार नाहींत अशी आशा आहे.

ह्या तिन्ही भागांतील एकंदर क्रमीक पुस्तकांत अनीतीच्या वर्तनाचे परिणाम वाईट व नीतीचे परिणाम चागले हें अनेक प्रसंगांनीं दाखविलें पाहिजे; कारण जसजशी विद्या प्राप्त होईल तसतसा मनुष्यांतील उद्धटपणा कमी होऊन त्याची विनयवृत्ति वाढत जावी. हें तत्व साधण्याकरितां सर्वच पुस्तकांत चांगली तजवीज केलेली असावी. म्हणजे शिकून तयार झालेले लोक बेफाम होण्याची भीति दूर होईल. त्याचप्रमाणें विद्यार्थ्यांत राजनिष्ठा व स्वदेशप्रीति उत्पन्न होऊन लोककल्याण करण्याची इच्छा त्यांच्या मनांत नेहेमीं जागृत राहील असा जागोजाग क्रमीक पुस्तकांत प्रसंग योजला पाहिजे.

दुसऱ्या मुद्याच्या संबंधानें जेवढ्या ठोकळ गोष्टी वाटल्या तेवढ्या दाखल केल्या आहेत. याखेरीज अवश्यक अशा ज्या राहिल्या असतील त्यांचा विचार करून कोणी प्रसिद्ध केल्यास फार उपयोग होईल.

कारण हें काम मोठ्या शहाणपणाचें, अनुभवाचें, व माहितीचें आहे. म्हणून ह्या विषयाकडे तशा लोकांनीं लक्ष दिल्याखेरीज त्याची पूर्णता होणार नाहीं हें उघडच आहे.

**तिसरा मुद्दा**–शिक्षणक्रमांत वरील फेरफार करण्याचे कामीं सर्कारानें काय करावें, व तसें करणें सरकारचें कर्तव्य आहे कीं काय हा होय. आमच्या देशाची सर्व सत्ता इंग्रज सरकारच्या हातीं गेल्यामुळें ह्या देशाच्या संप्रदायाप्रमाणें सरकार आह्मा सर्व रयतेचें मायबाप होय. ह्मणून सर्व प्रकारें आमचें कल्याण करण्याचें ओझें सरकारच्या शिरावर आलें आहे. खेरीज इंग्रजलोक आमच्या पेक्षां ज्ञानानें फार श्रेष्ठ आहेत. यामुळें ज्ञान संबंधानें आमची स्थिति सुधारण्याचे उपाय जितके त्यांस माहित असतील तितके आह्मास कळण्याचा संभव नाहीं. शिवाय सार्वजनिक व्यवहारशिक्षणाची कल्पना आजवर आमच्या मनांत देखिल आली नव्हती; ती केवळ इंग्रज सरकारच्या सहवासानेंच आमच्या मनांत थोडथोडी येऊं लागली आहे. तिचें खरें बीज पेरून तसल्या ज्ञानाचा आमच्या देशांत पुष्कळ प्रसार करण्याचें सरकारानेंच मनावर घेतलें तर सिद्धीस जाण्याचा संभव आहे. ह्मणून दयाळुपणानें सरकारानें हें काम लवकर हातीं घ्यावें. अशी आह्मा सर्वांची विनंती आहे. दुसऱ्या मार्गानें पाहिलें तरी प्रजेचें कल्याण करणें हें सरकारचें कर्तव्य आहे, हें सरकार जाणतच आहे.

आणखी एक शेतकऱ्यांचे तर्फेचें असें म्हणणें आहे कीं, जमिनीच्या धाऱ्याखेरीज लोकलफंडाच्या रूपानें आम्हाकडून दर वर्षी सरकार लाखो रुपये वसूल करतें. त्याचा योग्य मोबदला सरकार काय देतें? लोकलफंडांतून केवळ शेतकऱ्यांच्या खऱ्या ज्ञानवृद्धीकडे किती खर्च होतो? लोकलफंड बशिवतांना विद्यावृद्धीच्या कामीं बरीच रकम खर्च करण्याचा सरकारचा ठराव असतां शेतकऱ्यांच्या कामास उपयोगीं पडेल अशा प्रकारचें आजवर एकादें पुस्तक तरी झालें का? ह्याचा सरकारानें शोध करावा. शेतकरी म्हटले म्हणजे फार गरीब, त्यांस कोणी कितीही नाडलें किंवा मारझोड केली तरी सोसूनच घेतील. उलटून बोलण्याचें ज्ञान किंवा सामर्थ्य त्यांस नाहीं. अशा दीन व दुर्बल शेतकऱ्यांच्या निढळच्या घामाचे पैसे सरकार ठोकून वसूल करतें त्याच्या ऐवजीं त्या बिचाऱ्यांस सांगण्यासारखें कांहीं मिळत नाहीं. यामुळें हिशेबच पाहिला तर सरकारावर शेतकऱ्यांचें

मोठें ऋण चढलें आहे असें दिसून येईल. याकरितां वरील प्रकारानें कृपा करून सरकार शेतकऱ्यांचें कर्ज फेडूं लागल्यास सरकारचें ओझें हलकें होईल, व गरीब शेतकऱ्यांचें मोठें हित केल्याचें श्रेय येईल.

**चौथा मुद्दा**—ह्या संबंधानें रयत लोकांचें कर्तव्य कोणतें व तें न केल्यानें पुढें परिणाम काय होईल ह्याचा विचार करणें हा होय. आज ज्ञानाच्या संबंधानें आम्हा रयत लोकांची स्थिति फार शोचनीय झाली आहे. म्हणूनच आपण सर्वांनीं सर्व गोष्टींत इंग्रज सरकारच्या मांडीवर आपल्या माना ठेवल्या आहेत. हें समजून मोठ्या दयाशील अंतःकरणानें सरकार आमचें सर्वतोपरि रक्षण करतें हें त्यांस मोठें भूषण आहे. तथापि आपण त्यांजवर भार तरी कुठवर घालावा? आपण यथाशक्ती त्यांस कांहींच मदत न केली तर आमच्या अपेक्षा सरकारास तरी कशा कळतील? या करितां आम्हांस हवें काय व नको कोणतें हें विनयवृत्तीनें आम्हीच सरकारास कळविलें पाहिजे. याखेरीज आमचें खरें मानस कळण्याचा सरकारास दुसरा मार्ग नाहीं. ही गोष्ट मनांत वागवून आमच्या सर्व लोकांनीं वागलें पाहिजे. आम्ही वर ज्या सूचना केल्या आहेत त्या ह्याच विचाराचे धोरणाच्या आहेत असें वाचणारांच्या ध्यानांत येईल. म्हणून आतां सर्व लोकांस हात जोडून आमची अशी विनंती आहे कीं, चालू शिक्षण क्रमांत ज्या न्यूनता दिसतील त्या युक्तीनें सरकारच्या कानावर घालण्याचा वारंवार प्रयत्न करावा. आपण संकोच्यानें जर मुग्ध बसलों तर आमचें नुकसान होणार आहे. आपल्या अज्ञानामुळें व मुकेपणामुळें आपण आजपर्यंत कोणत्या स्थितीस येऊन पोंचलें-हें आपण सर्व अनुभवीत आहों. याप्रमाणें यापुढेंही आपण मुकाट्यानींच बसल्यास याहीपेक्षां आपली फार दुर्दशा होईल. ती टाळण्याकरितां आतां तरी सावधगिरीनें वागलें पाहिजे. वरील सूचनेप्रमाणें आमचें दयाळू सरकार शिक्षणक्रमांत योग्य फेरफार कांहीं तरी करील असा भरंवसा आहे. तथापि तसें नच होईल तर आमच्यांतील सूज्ञ लोकांनीं पुढें सरसावून वरील सूचनेच्या धोरणाचें प्रत्यक्ष उदाहरण तयार करून दाखवावें. म्हणजे त्यांत खरोखरच हित आहे असें दिसून आल्यास सरकार व लोक त्या शिक्षणक्रमाचा आदरानें स्वीकार करतील यांत संशय नाहीं.

शेवटीं आमच्या सर्व लोकांस हात जोडून येवढेंच सांगणें आहे कीं,

सध्यां आमच्या देशावर कोणचेंही परचक्र आलें नाहीं, आम्हास कोणी लुटीत नाहीं, व कोणी मारीत किंवा झोडीतही नाहीं. असा बाह्य प्रकार असतां केवळ सार्वजनिक व्यवहारशिक्षणाच्या अभावामुळें अज्ञानाच्या परिणामाचीं सर्व संकटें आम्हावर कोसळत आहेत. दरिद्र तर जिकडे तिकडे मी मी ह्मणत आहे. उद्योग धंद्याचा फारच तोटा पडला आहे. आतां काय करावें हें सुचेनासें झालें आहे. अशा रीतीनें सर्व प्रकारच्या संकटांची व दुःखांची जणू काय आमच्यावर वृष्टीच होत आहे. यांतून पार पडण्यास ज्ञानावांचून दुसरें कोणतेंही साधन नाहीं. हें जाणून ह्या सत्कृत्याचें यश घेण्यास जो पुढें सरसावेल तोच आमच्या भूमातेचा खरा सुपुत्र. त्याणेंच आमच्या देशांतील सर्व लोकांचीं अज्ञानरूप बंधनें तोडून खरी मुक्तता केली असें होईल. याकरितां परमेश्वर कृपेनें ह्या गोष्टीची प्रेरणा ज्यांच्या मनांत होईल त्यांणीं आपआपल्या शक्तीनुरूप झटून प्रयत्न करावा, म्हणजे सिद्धिदाता परमेश्वर त्यांस खचीत यश देईल.

---

# सार्वजनिक व्यवहार शिक्षण.

युरोपांतले लोक सर्व व्यवहारिक कृत्यांत पटाईत होऊन आम्हापेक्षां कशानें पुढें सरसावले, आणि आम्हीच कां मागें पडलों; व ही स्थिति घालविण्यास आतां आम्ही निश्चयात्मक असा कोणता उपाय करावा, हें ह्या पुस्तकांत स्पष्ट सांगितलें आहे. जे लोक हें पुस्तक वाचतील त्यांचें मन स्वदेश कल्याणार्थ झटण्यास जागृत होईल, असा ह्या लेखांत गुण ओतला आहे. ह्याची किंमत ८६ असून शिवाय टपालखर्च ०८६ पडेल. एका आण्यांत चार पांच प्रती जातील पुस्तकें पुढील ठिकाणीं विकरीस ठेवलीं आहेत.

**पुण्यांत**—ज्ञानप्रकाश छापखान्यांत.

,, बुधवार पेठेंत रा० रा० नारो आपाजी गोडबोले यांचे दुकानीं.

**मुंबईत**—नेटिव ओपिनियन छापखान्यांत.

,, मारकेटांत खारे कुव्याच्या समोर वे० सं महादेव शास्त्री अमरापुरकर यांचे दुकानीं.

**सोलापुरांत**—रा० रा० लक्ष्मण शिवराम कोल्हटकर बी. ए. अ० मास्तर हायस्कूल.

**ठाणें**—रा० जनार्दन बाळाजी मोडक बी. ए. हेड मास्तर हायस्कूल.

**बडोदें**—रा० रा० रामकृष्ण जनार्दन कीर्तने.

**नवसरी**—रा० रा० नागेशराव विनायक बापट.

**अहमदनगर**—रा० रा० शंकर रामचंद्र हातवळणे अ० मास्तर हायस्कूल.

**अकोला-वऱ्हाड**—रा० रा० रघुनाथ बाळकृष्ण तळवलकर बी. ए. अ० मास्तर हायस्कूल.

**धुळें**—रा० रा० जनार्दन भिकाजी खरे वकील.

ता० ८ जुलई १८८२.

**पुस्तककर्ता.**